


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध


Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : ३५८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०८ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## टाकळी ढोकेश्वर बसस्थानक व बायपास रस्त्यावर टवाळखोरांचा उपद्रव वाढला !

### रोड रोमियोचा बंदोबस्त करण्याची बाळासाहेब खिलारींची मागणी



● विद्यालयाची बदनामी नको, म्हणून सहानुभूती दाखवणाऱ्यांना विद्यालयातील विद्यार्थ्यांनीना होणारा त्रास दिसत नाही का? रोडरोमिओंबद्दल ‘ब्र’ शब्दही काढण्यात येत नाही. त्यांच्याबद्दल कोणी तक्रार करत नाही यामुळे पालकवर्गांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

● विद्यालय परिसरात पोलिसांनी साध्या गणवेशात गस्त घालून पाहाणी केल्यास सर्व प्रकार समोर येईल. तसेच परिसरात दहशत निर्माण करणारे रोडरोमिओंचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी प्रतिष्ठानसह पालक वर्गातून होत आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर परिसरात रोडरोमिओंनी धुमाकूळ घातला असून, त्यांची दहशत दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. त्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब खिलारी व प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे.

सविस्तर माहिती अशी की, टाकळी ढोकेश्वर परिसरामध्ये श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जवाहर नवोदय विद्यालय,ढोकेश्वर महाविद्यालय, नर्सिंग कॉलेज,रयत शिक्षण संस्थेचे कन्या विद्यालय तसेच मेडिकल कॉलेज व इंजीनियरिंग कॉलेज आहेत. विद्यालयांमध्ये सध्या परीक्षा सुरू असून, विद्यालयाच्या मार्गावर पारनेर चौक ते महात्मा फुले चौक बायपास रोड तसेच टाकळी ढोकेश्वर बसस्टँडवर धूम स्टाईल गाडी चालवणे, मुलींना कट मारणे, अश्लील हावभाव करणे, नशेत असणारे रोडरोमिओ घोळक्याने राहत असून, त्यांची दहशत परिसरात वाढत चालली आहे. गाडीच्या सायलेन्सरमध्ये बदल करून विचित्र आवाज काढणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत.

टाकळी ढोकेश्वर येथे शिक्षणासाठी मांडवे खुर्द, देसवडे, खडकवाडी, वनकुटे, पळशी, भाळवणी, ढवळपूरी, पोखरी,तिखोल, धोत्रे, कर्जुले हार्या परिसरातून विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षण घेण्यासाठी येतात. परंतु विद्यालयाच्या मार्गावर जभोवती तसेच वाड्यावर जाणार्या रस्त्याने मुलींची छेडछाड काढण्याचे प्रकार वाढले आहेत. बसस्टँड, पारनेर चौक परिसर, टाकळी गावात जाणारा मुख्य रस्ता, महात्मा फुले चौक, नगर कल्याण बायपास रोड, नवोदय विद्यालय रोड या परिसरात रोडरोमिओंचा वावर कायमच आढळून येतो. अल्पवयीन मुले घातक हत्यारे सोबत बाळगत असल्याची चर्चा असून, टाकळी ढोकेश्वर परिसरात अनेक वेळा रोडरोमिओंमध्ये हाणामारीही झाली आहे. तसेच शिक्षकांना अरेरावी करण्याचे प्रकारही घडले आहेत. छेडछाड झाली, तरी विद्यार्थिनी व पालकही बदनामी नको म्हणून तक्रार करत नाहीत. याचाच फायदा रोडरोमिओ उचलत आहेत. पोलिस सरळ डोळे झाक करत आहेत. या सर्व सुरू असलेल्या प्रकाराला पोलिस प्रशासन जबाबदार असल्याचे पालक वर्गाचे म्हणणे आहे. रोडरोमिओंच्या दहशतीमुळे वाड्या- वस्त्यांवरील पालकांना आपले काम सोडून पाल्यांना शाळेत सोडविण्यासाठी व नेण्यासाठी ये-जा करावी लागत आहे.

## राज्यातील सर्व रक्तकेंद्रांसाठी तुकाराम मुंढेंचा मोठा निर्णय



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** राज्यातील सर्व परवानाधारक रक्तकेंद्रे आणि रक्तसाठवणूक केंद्रांसाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) प्रथमच सर्वसमावेशक ‘कॉम्प्लायन्स ऑर्डर’ जारी केला आहे. रक्तसुरक्षा, गुणवत्ता आणि नियामक नियमांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रक्तकेंद्रांवर कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

एफडीएने जारी केलेल्या आदेशानुसार रक्तसंकलनापासून रक्त वितरणापर्यंत प्रत्येक टप्प्यासाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ, रक्तदात्यांची निवड, रक्त व रक्तघटकांची अनिवार्य तपासणी, योग्य साठवण, गुणवत्ता नियंत्रण, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, सुरक्षित वाहतूक आणि ई-रक्तकोश पोर्टलवर दररोज माहिती अद्ययावत ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्यातील काही रक्तकेंद्रांच्या तपासणीत शेड्यूल एफ, भाग XII-B मधील नियमांचे पूर्ण पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्याने राज्यभर एकसमान आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी हा आदेश जारी करण्यात आला आहे.

प्रत्येक रक्तपिशवीची एचआयव्ही, हिपॅटायटिस बी, हिपॅटायटिस सी, सिफिलिस आणि मलेरिया यांसाठी तपासणी अनिवार्य करण्यात आली असून, रक्तकेंद्रांनी नियमित सेल्फ-ऑडिट करणेही आवश्यक राहणार आहे.

एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सांगितले की, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण रक्त मिळणे हा प्रत्येक रुग्णाचा अधिकार असून, या आदेशामुळे राज्यातील सर्व रक्तकेंद्रांमध्ये एकसमान दर्जा, पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण आणि कायदेशीर पालन अधिक बळकट होईल.

‘महाराष्ट्र टाइम्स’ने जेजे महानगर रक्तपेढीसह इतर रक्तकेंद्रातील गैरप्रकार उघडकीस आणल्यानंतर एफडीएने अशा प्रकारचे पहिले रक्तधोरण राज्यातील सर्व रक्तपेढ्या, रक्तसंकन शिबिरांसाठी जारी केले आहे. त्यामुळे रक्ताची उपलब्धता, संकलन, दुर्धर रक्ताचा आजार असलेल्या रुग्णांना रक्ताची उपलब्धता यात सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.

## ३.२८ लाखांची देशी-विदेशी दारु जप्त ! बल्लारपूर पोलिसांची कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, बल्लारपूर (चंद्रपूर) :** पोलीस ठाणे, बल्लारपुर येथे दि. ०६/०८/२०२६ चे दुपारी १५:५७ वा. ते १६:२० वा. दरम्यान मिळालेल्या गुप्त माहीतीच्या खबरेवरून राजेंद्र प्रसाद वार्ड, मक्का मस्जिद ते नाग मंदीर कडे जाणाऱ्या रस्ताने एक इसम हा आपले जांभळ्या रंगाची चारचाकी वाहनामध्ये अवैद्यरित्या दारु बाळगून जात आहे. अशा मुखबीरद्वारे मिळालेल्या खबरेवरून आम्ही, पंच व पोलीस स्टॉफ असे तपास साहित्यासह खाजगी वाहनाने मुखबिरानी दिलेल्या खबरे प्रमाणे राजेंद्र प्रसाद वार्ड, नाग मंदिर जवळील रस्तावर नाकाबंदी केली असता, एक जांभळ्या रंगाची टाटा कंपनीची इंडीगो मांझा वाहन क्रमांक एमएच-३४ एए-६९०६ हे मक्का मस्जिद ते नागमंदिर कडे येणाऱ्या रोडने येताना दिसले. सदर वाहनास पंचासमक्ष पोस्टॉफ च्या मतदीने थांबवून त्यास आम्ही आमचा व पंचांचा परिचय देवून त्याला त्यांचे नाव, गाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव ख्वाजा शेख उर्फ बडे मोहम्मद शेख, वय ५२ वर्षे, धंदा-मजूरी रा.



साईबाबा वार्ड, भेंडे नाला, बल्लारपूर, ता. बल्लारपुर, जि. चंद्रपुर असे सांगीतले. नमुद इसमास त्याची गाडी थांबविण्याचा उद्देश सांगून त्याचे टाटा कंपनीची इंडीगो मांझा वाहनाची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्याचे वाहनाचे मागील बाजुचा दरवाजा उघडून बघितले असता, त्यामध्ये खाकी रंगाचे खरडयाचे बॉक्स दिसुन आले त्यापैकी एक बॉक्स पंचासमक्ष फाडून पाहिला असता, त्यामध्ये रॉकेट संत्रा कंपनीची देशी दारु ९० एम.एल. नी भरलेल्या सिलबंद प्लॉस्टिक चापट शिशा दिसुन आले. तसेच वाहनाचे मधल्या भागाचा दरवाजा उघडून बघीतला असता, त्यामध्ये एका खाकी रंगाच्या खरडयाचे बॉक्स मध्ये विदेशी दारु सह्यांद्री गोल्ड प्रिमियम व्हिस्की कंपनीच्या १८० एम.एल. नी भरलेल्या सिलबंद काचेच्या शीशा तसेच मुंबई माल्ट व्हिस्की कंपनीच्या ९० एम.एल. नी भरलेलं प्लॉस्टिक चापट शिशा मिळून आल्या. सदरचा देशी व विदेशीचा माल असा एकुण ०३,२८,०७०/- रू चा मुद्देमाल अवैधरित्या मिळुन आला. सदरचा घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करून पो स्टे ला अप क ८२१/२०२६ कलम ६५ (अ) म.दा. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक आयुष नोपानी, अपर पो. अधिक्षक ईश्वर कातकडे, सुधिर नंदनवार उपविभागिय पो. अधिकारी, राजूरा यांचे मार्गदर्शनात पो. निरिक्षक बिपीन इंगळे, पोलीस उपनिरिक्षक उमेश जोगदंड, पो.अं. महेश कुकुडकर /१५२७, फुलचंद लोधी/१६०१, शांतकुमार घोसे/९८३, लखन चव्हान/१२०२, इत्यादी पो. स्टाफ यांनी अतिशय कुशलतेने देशी व विदेशी दारूचा साठा जप्त केला.

## चंद्रपूरच्या ९०० शिक्षकांना उच्च न्यायालयाचा अंतरिम दिलासा

### ॲड. दीपक चटप यांचा उच्च न्यायालयात युक्तिवाद



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** सतीश वसंतराव बावणे व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणात चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या आदिवासी, मिनी माडा, माडा, आदिवासी उपाययोजना क्षेत्र तसेच आदिवासी महसुली ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर गावांमध्ये कार्यरत सुमारे ९०० शिक्षकांनी सन २००२ च्या शासन निर्णयानुसार देय लाभ मिळण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली आहे. या प्रकरणात आज मा. न्यायालयाने प्रतिवादींना नोटीस बजावून ती २७ ऑगस्ट २०२६ पर्यंत उत्तर देण्यास सांगितले आहे.

याचिकाकर्त्या शिक्षकांची बाजू ॲड. दीपक चटप यांनी मांडली, तर राज्य शासनाच्या वतीने ए.जी. माटे यांनी बाजू मांडली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड दीपक चटप यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, नंदुरबार, अहिल्यानगर आदी जिल्ह्यांतील आदिवासी क्षेत्रात कार्यरत शिक्षकांना सन २००२ च्या शासन निर्णयानुसार लाभ देण्यास पात्र ठरवले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पात्र शिक्षकांना मात्र या लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी १६ एप्रिल रोजी संबंधित शिक्षकांना लाभ देण्याबाबत पत्र काढले होते; मात्र त्यानंतर २२ एप्रिल रोजी त्याच पत्राच्या अंमलबजावणीला तात्पुरती स्थगिती देण्यात आली. शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याऐवजी त्याला स्थगिती देण्यात आल्याने आदिवासी व दुर्गम भागात प्रतिकूल परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला.

या प्रकरणात मा. न्या. अनिल एल. पानसरे व न्या. राजनिश आर. व्यास यांच्या खंडपीठाने प्रतिवादींना नोटीस बजावताना, याचिकाकर्ते सन ०६ ऑगस्ट २००२ च्या शासन निर्णयानुसार पात्र असल्यास त्यांना लाभ मिळण्यासाठी आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील सुमारे ९०० शिक्षकांना दिलासा मिळाला असून, २००२ च्या शासन निर्णयानुसार पात्र शिक्षकांना त्यांचे हक्काचे लाभ मिळण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे.

२७ ऑगस्ट २०२६ रोजी या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे. अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ जिल्हाध्यक्ष सतीश बावणे यांनी शिक्षकांच्या हिताने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी हे तातडीने पाऊले उचलतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

## आता गणपती बाप्पांच लोकेशन होणार ट्रॅक !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, नागपूर :** गणेश विसर्जनादरम्यान होणारी गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता यंदा महापालिकेतर्फे विसर्जन वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे. त्यामुळे विसर्जन वाहनांची नेमकी स्थिती समजून वाहतूक नियोजन करणे पोलिसांना सोपे होणार आहे.

**गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा बैठक :** गणेशोत्सवाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी महापालिका मुख्यालयात गुरुवारी महापौर नीता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, अपर पोलिस आयुक्त विनीता शाहू व वसंत परदेशी, अतिरिक्त आयुक्त अंकित यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रमाणपत्रे ऑनलाइन पद्धतीने दिली जात आहेत. बैठकीत आयुक्त डॉ. इटनकर यांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षांपासून गणेशोत्सव मंडळांना परवानगी आणि ना हरकत प्रमाणपत्रे ऑनलाइन पद्धतीने दिली जात आहेत. यात वाहतूक, अग्निशमन आणि विद्युत विभागाच्या मंजुरीचाही समावेश आहे. नियमितपणे त्याच ठिकाणी गणेशोत्सव साजराकरणाऱ्या मंडळांना तातडीने मंजुरी देण्यात यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**जीपीएस बसविण्याचा प्रयोग :** विसर्जनाच्या वेळी एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये, यासाठी विसर्जन वाहनांवर जीपीएस बसविण्याचा प्रयोग करण्यात येणार आहे. वाहनांची हालचाल आणि गर्दीची ठिकाणे समजल्यास वाहतूक विभागाला तातडीने उपाययोजना करता येतील. धर्मादाय आयुक्त कार्यालयाची परवानगीही यंदापासून ऑनलाइन एक खिडकी पद्धतीने उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे सांगण्यात आले.


**एक खिडकी योजना प्रभावीपणे राबवावी :**

ना हरकत प्रमाणपत्रे आणि परवानग्या ऑनलाइन पद्धतीने एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी एक खिडकी योजना प्रभावीपणे राबवावी, असे महापौरांनी सांगितले. सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर यांनी विसर्जनस्थळी टॉवर उभारून ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्याची सूचना केली.

**गणेशोत्सव मंडळांना सर्व परवानग्या वेळेत मिळतील :**

गणेशोत्सव मंडळांना सर्व परवानग्या वेळेत मिळतील, असा विश्वास पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटीलयांनी व्यक्त केला. मोठ्या गणेशोत्सव मंडळांनी आगीपासून संरक्षणासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशा सूचना त्यांनी केल्या. आग लागल्यास मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक बाधित होण्याची शक्यता असते. त्यामुळे गर्दी नियंत्रण, घातपात रोखणे आणि वाहतूक व्यवस्थापन या तीन बाबींवर विशेष लक्ष देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

## ‘पीजी’ मध्ये राहणाऱ्या तरुणाची हत्या, तर तरुणी गंभीर जखमी



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, पुणे :** विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची ओळख होती, पण आता वाढत्या गुन्हेगारीच्या घटना पाहता पणे गुन्ह्यांचं माहेर घर होतंय का? असा प्रश्न पुन्हा उपस्थित होत आहे. पुण्यात अनेक महिलांवर अत्याचार झाल्याच्या घटना समोर आल्या, आता भरदिवसा PG मध्ये राहत असलेल्या तरुणाची हत्या झाली असून तरुणी गंभीर जखमी असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. PG मध्ये असलेल्या सीसीटीव्ही फुटेजमुळे घडलेली घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तरुणीवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु असून, प्रेमाच्या त्रिकुटामुळे मोठी घटना घडल्याचं तपासात समोर आलं आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

संबंधित घटना पुणे येथील हिंजवडी भागात घडली आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, हिंजवडी स्थित सात मजल्यांच्या PG मध्ये गेल्या चार महिन्यांपासून सागर गायकवाड मॅनेजर म्हणून काम करत होता बुधवारी रात्री एक तरुणी एका महिन्यासाठी त्याच PG मध्ये राहण्यासाठी आलेली. तरुणीने PG संचालकाला सांगितलं की, ‘सागर माझा बॉयफ्रेंड आहे’, त्यामुळे तिच्या राहण्याची व्यवस्था तिसऱ्या मजल्यावर करण्यात आली. PG मधील ३१० नंबरच्या खोलीत तरुणीला राहण्यासाठी जागा मिळाली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दिनेश महादेव झांबरे नावाचा तरुण PG मध्ये आला. दिनेश याने सांगितलं, सागर याला भेटायचं आहे आणि तिची प्रेमिका देखील येथेच राहते, PG मधील कर्मचाऱ्याने सांगितलं की, सागर तिसऱ्या मजल्यावर राहत आहे. त्यानंतर दिनेश स्वतः तिसऱ्या मजल्यावर पोहोचला. तो पोहोचल्यानंतर, काही वेळातच ओरडण्याचा आवाज येऊ लागला जेव्हा घटनास्थळी लोकांची गर्दी जमली, तोपर्यंत उशीर झालेला. सागर जमिनीनर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेलाय. दिनेश याने सागर याच्यावर लोखंडी रॉडने वार केले. कथित आरोपीने तरुणीवर देखील जीवघेणा हल्ला केला.

सुरुवातीच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, दिनेश आणि तरुणी शाळेत असल्यापासून एकमेकांच्या संपर्कात होते. दोघांमध्ये प्रेमसंबंध असल्याची माहिती देखील समोर येत आहे. त्यानंतर दोघे बीसीएचं शिक्षण घेण्यासाठी पुण्यात आले. पुण्यात आल्यानंतर तरुणी आणि सागर यांच्यातील संबंध रिलेशनशिपपर्यंत पोहोचले पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, याच कारणामुळे कथित आरोपीने असं कृत्य केलं.




## निफ्टीचे अहिंसक वळण

यावर्षी पंढरपूर वारीची सुरुवात झाल्यावर दोन-तीन दिवसांनीच, १० जुलैला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजने आपल्या शेअर बाजारासाठी अहिंसा इंडेक्स प्रकाशित करायला सुरुवात केली. ऐन वारीच्या मोसमात आपल्या संतांच्या एका महत्त्वाच्या शिकवणीवर, अर्थात अहिंसेवर आधारित निर्देशांक अस्तित्वात येणं हा निव्वळ योगायोग असू शकेल. पण यामुळे नैतिकतेवर आधारित गुंतवणुकीचे दिवसागणिक वाढते महत्त्व आणि भारतातील सगळ्यात मोठ्या स्टॉक एक्स्चेंजने त्याची घेतलेली दखल लक्षात येते. जणू काही तुकाराम महाराजांच्या या अभंगावरच हा निर्देशांक आधारित आहे!

**भूतांची दया हेचि भांडवल।**
**संतांचे हे बोल मुख्य आहे।।**
**दया कीव करा प्राण्यांची केवळ।**
**नका करू छळ कोणाचाही।।** निफ्टी अहिंसा निर्देशांक हा सगळ्यात मोठ्या ५०० कंपन्यांपैकी ज्या कंपन्या व्यवसाय करताना अहिंसेचे अनुसरण करतात आणि प्राण्यांवरील क्रूरता व निर्दयता टाळतात, अशा कंपन्यांवर आधारित आहे. ही वर्गवारी अहिंसा गेन फाउंडेशनने प्रकाशित केलेल्या अहिंसा गुंतवणूक आराखड्याप्रमाणे केली जाते. हे वर्गीकरण दर सहा महिन्यांनी केले जाईल. यामध्ये कंपन्यांनी अहिंसेच्या आणि प्राण्यांविषयी आत्मीयतेच्या तत्त्वाचे पालन किती प्रमाणात केले आहे, यावरून त्यांची विभागणी तीन गटांमध्ये ट्रॅफिक सिग्नलप्रमाणे हिरवा, पिवळा आणि लाल – केली जाईल. केवळ हिरव्या गटातील कंपन्यांचा या निर्देशांकामध्ये समावेश केला जाईल. पहिल्या सहा महिन्यांसाठी ५०० पैकी ३२६ कंपन्या या निर्देशांकात समाविष्ट करण्यासाठी पात्र ठरल्या आहेत. प्राण्यांवर चाचणी करून औषधे विकसित करणाऱ्या औषध कंपन्या, डेअरी, लोकर, चामडे, मांस अशा प्राणिज पदार्थांचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या आणि अशा कंपन्यांबरोबर व्यवसाय करणाऱ्या बँका वा फायनान्स कंपन्यांना अर्थातच लाल गटात समाविष्ट करून अपात्र ठरवले गेले आहे. १० एप्रिल २०१६ ला या निर्देशांकाची पातळी १००० मानली गेली आहे. इतर निर्देशांकांप्रमाणेच यामध्येही कंपन्यांच्या बाजारमूल्यावर आधारित त्यांचा सापेक्ष प्रभाव ठरेल. खरं तर शेअर बाजाराचा निर्देशांक हा देशाच्या आर्थिक विकासाचा मापदंड मानला जातो. देशाच्या या प्रगतीमध्ये अनेक प्रकारच्या उद्योगधंद्यांचा आणि लहान-मोठ्या कंपन्यांचा सहभाग असतो. आणि कुठल्याही एका दिवशी हे सगळे उद्योगधंदे आणि विविध आकाराच्या कंपन्या त्यांच्या त्यांच्या विकासचक्राच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असतात. त्यामुळे देशाच्या आर्थिक परिदृश्याच्या योग्य वर्णनासाठी केवळ एकच निर्देशांक पुरेसा नसून महत्त्वाच्या उद्योगांसाठी तसेच लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराच्या कंपन्यांसाठी वेगवेगळे निर्देशांक प्रकाशित करणे जास्त समर्पक ठरते. अशा विविध निर्देशांकांचा संदर्भासाठी वापर करून गुंतवणूकदार महत्त्वाचे निर्णय घेतात; तसेच गुंतवणुकीतून मिळालेल्या परताव्याची तुलना या निर्देशांकांशी करतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये जास्तीत जास्त नफा कमावण्यावर गुंतवणूकदारांचा भर असतो. त्यामुळे कुठल्या प्रकारचे उद्योगधंदे भविष्यात चांगला परतावा देण्याची शक्यता आहे, ते शोधून त्यामध्ये गुंतवणूक करण्यासाठी असे विविध निर्देशांक आवश्यक असतात. नॅशनल स्टॉक एक्स्चेंज आज ४०० पेक्षा जास्त, तर मुंबई स्टॉक एक्स्चेंज १०० पेक्षा जास्त निर्देशांक प्रकाशित करते. असे असताना साहजिकच प्रश्न उपस्थित होतो, की अहिंसा आणि भूतदया या तत्त्वांना या भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये खरंच स्थान आहे का? ही तत्त्वं अनुसरताना जर कंपन्यांचा नफा कमी झाला किंवा गुंतवणूक करण्यासाठी उपलब्ध कंपन्यांची संख्या कमी झाली, तर ते स्वीकारले जाईल का? तुलनेसाठी, साधारण दोन दशकांपूर्वी ईएसजी – एन्व्हायर्न्मेंटल, सोशल, गव्हर्नन्स – संकल्पनेची सुरुवात झाली, तेव्हाही असे प्रश्न उपस्थित केले गेले होते. पण अतिशय वेगाने ढासळणारे पर्यावरणाचे संतुलन पाहता हळूहळू गुंतवणूकदारांचा कल नैतिकतेने आणि जबाबदारीने केलेल्या गुंतवणुकींकडे वळायला लागला. अनेक देशांमध्ये कंपन्यांच्या वार्षिक अहवालात ईएसजीसाठी केलेल्या प्रयत्नांची नोंद करावी लागते. आपल्याकडेदेखील सेबीने बीआरएसआर रिपोर्टिंग सुरू केले आहे. काही बँकांनी पर्यावरणासाठी घातक पदार्थांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना कर्ज देणे बंद केले आहे. यामुळे आता ईएसजी दृष्टिकोन ऐच्छिक राहिलेला नसून अस्तित्वासाठी आवश्यक बनलेला आहे. आणि वेगवेगळ्या शेअर बाजारांमध्ये अशा कंपन्यांचा समावेश असलेले निर्देशांक लोकप्रिय ठरत आहेत. उदाहरणार्थ MSCI World SRI, FTSE4Good, Dow Jones Sustainability Index आणि SP 500 ESG Index. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजने सुद्धा Nifty100 ईएसजी इंडेक्स प्रकाशित करायला साधारण आठ वर्षांपूर्वी सुरुवात केली आहे. त्यामुळे यापुढे कदाचित ईएसजी दृष्टिकोन अवलंबणाऱ्या कंपन्यांसाठी भांडवलाची उपलब्धता सोपी असू शकेल.

– समीर कुळकर्णी

# विनोद सम्राट शाहीर : दादा कोंडके

आज ८ ऑगस्ट, आपल्या इरसाल आणि गावरान भाषेतील विनोदाने महाराष्ट्राला खळखळून हसवणारे विनोद सम्राट शाहीर दादा कोंडके यांची जयंती. जवळपास तीन दशकांहून अधिक काळ मराठी चित्रपट सृष्टीवर एकहाती अधिराज्य गाजवून मराठी सिनेमाला सुवर्णकाळ दाखवणाऱ्या विनोद सम्राट दादा कोंडके यांचा जन्म ८ ऑगस्ट १९३२ रोजी मुंबईतील नायगाव येथे झाला.

त्यांचा जन्म झाला तो दिवस गोकुळ अष्टमीच्या होता, आपल्या पोटी बाळकृष्ण जन्माला आला म्हणून आई वडिलांनी त्यांचे नाव कृष्णा ठेवले. पण लहानपणापासूनच सर्व जन त्यांना दादा म्हणत पुढे त्यांचे नाव रूढ झाले. त्यांच्या मोठ्या बंधूचे निधन झाल्याने त्यांच्यावर घराची जबाबदारी पडली त्यामुळे दादा दरमहा साठ रुपये पगारावर सेवादलाच्या बँड पथकात काम करू लागले. लहानपणापासून दादांना कलेची आवड होती. सेवादलाच्या बँड पथकात त्यांच्या कला आणखी बहरून आल्या. फावल्या वेळात प्रसिद्ध गाण्यांचे विडंबन करणे, गाण्यांना चाली लावणे, विचित्र गाणी रचणे असे उद्योग दादा करू लागले. निळू फुले, राम नगरकर यासारखे जेष्ठ कलाकारही त्या काळात सेवादलात होते. तिथेच दादांची या महान कलाकारांशी मैत्री झाली आणि ही मैत्री पुढे आयुष्यभर टिकून राहिली. दादा सेवादलाच्या बँड पथकात काम करत असल्याने त्या काळात त्यांना बँड वाले दादा म्हणूनच लोक ओळखत असे. पुढे दादांनी स्वतःचा फड काढला. गावोगावी जाऊन दादा स्वतःची कला सादर करू लागले. वसंत सबनिसांच्या विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. विच्छा माझी पुरी करा या वगनाट्याने दीडशे प्रयोग पूर्ण केले. त्या काळी हा विक्रम होता. या वगनाट्यामुळे दादा भलतेच लोकप्रिय झाले. गावागावांतील रसिक प्रेक्षक दादांना ओळखू लागले. याच वगनाट्यातील त्यांचे काम पाहून महान दिग्दर्शक भालजी पेंढारकर यांनी त्यांना थेट चित्रपटात काम करण्याची संधी दिली. भालजी पेंढारकर यांनी त्यांना त्यांच्या तांबडी माती या चित्रपटात मुख्य भूमिका दिली. दादांनी या भूमिकेचे सोने केले. हा चित्रपट तिकीटबारीवर हिट झाला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतर दादांनी मागे वळून पाहिले नाही. मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके हे सर्वत्र नाव घुमू लागले.





**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

१९७१ साली दादा कोंडके यांनी दिग्दर्शित केलेला सोंगाड्या हा चित्रपट प्रदर्शित झाला मात्र मुंबईतील चित्रपटगृह चालकांनी आपल्या चित्रपटगृहात सोंगाड्या न लावता तीन देविया हा हिंदी चित्रपट लावला. आपल्या पहिल्याच चित्रपटाला चित्रपटगृह मिळत नसल्याचे पाहून दादा उद्विग्न झाले आणि त्यांनी थेट बाळासाहेब ठाकरेंची भेट घेतली मग काय बाळासाहेबांचा आदेश आणि शिवसैनिकांचा चित्रपटगृहात राडा. शिवसैनिकांनी चित्रपटगृहात घातलेल्या राड्याने आणि बाळासाहेबांच्या आदेशाने सोंगाड्या चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. नुसताच प्रदर्शित झाला नाही तर सुपर डूपर हिट झाला. सोंगाड्या पाहायला प्रेक्षकांच्या रांगा लागल्या. सोंगाड्या हा त्या काळातील सर्वाधिक हिट मराठी चित्रपट ठरला. सोंगाड्यामुळे मरगळलेल्या मराठी चित्रपट सृष्टीला ऊर्जितावस्था मिळाली. तमाशापटाला कंटाळलेल्या मराठी चित्रपट रसिकांना सोंगाड्यात दादांनी आपल्या विनोदाने मनमुराद हसवले. दादांच्या विनोदाला मराठी रसिकांनी मनमुराद दाद दिली. सोंगाड्याच्या अभूतपूर्व यशानंतर दादा कोंडके यांनी आणखी एका नव्या चित्रपटाची घोषणा केली या चित्रपटाचे नाव होते एकटा जीव सदाशिव. सोंगाड्यामुळे दादांची लोकप्रियता तुफान वाढली होती. या लोकप्रियतेचा धसका हिंदी चित्रपट सृष्टीनेही घेतला होता. दादांनी एकटा जीव सदाशिव या चित्रपटाची घोषणा केल्यावर राज कपूर यांनी त्यांच्या मुलासाठी म्हणजे ऋषी कपूर साठी काढलेला बॉबी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली. सोंगाड्या पाठोपाठ एकटा जीव सदाशिव हा चित्रपटही सुपर हिट झाला. त्यानंतर दादांनी पांडू हवालदार या चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटात दादांनी अशोक सराफ यांना संधी दिली. हा चित्रपटही यशस्वी ठरला मग काय त्यानंतर दादांच्या यशस्वी चित्रपटांची मालिकाच सुरू झाली. तुमचं आमचं जमल, राम राम गंगाराम, बोट लावील तिथं गुदगुल्या, ह्योच नवरा पाहिजे, आली अंगावर, मुका घ्या मुका, पळवा पळवी, येऊ का घरात, सासरचे धोतर असे दादांचे सलग चित्रपट यशस्वी झाले. सलग नऊ रौप्य महोत्सवी चित्रपट देण्याचा विक्रम दादांनी केला. त्यांच्या या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. त्यांच्या यशस्वी चित्रपटात त्यांच्या इरसाल विनोदाचा जितका वाटा होता तितकाच त्या चित्रपटातील श्रवणीय गाण्यांचा देखील होता. दादा कोंडके यांच्या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. आजही दादांच्या चित्रपटातील गाणी तितकीच लोकप्रिय आहेत. दादांचे चित्रपट जितके लोकप्रिय झाले तितकेच ते वादग्रस्तही ठरले. त्यांच्या सर्वच चित्रपटांना सेन्सॉर बोर्डने आडकाठी आणली मात्र दादांनी सेन्सॉर बोर्डाच्या या दंडेली पुढे कधीही नमते घेतले नाही उलट सेन्सॉर बोर्डशी त्यांनी कायम दोन हात केले. ज्या शिवसेनेमुळे त्यांचे चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकले त्या शिवसेनेशी त्यांनी कधीही प्रतारणा केली नाही. आयुष्यभर त्यांनी शिवसेनेशी बांधिलकी राखली. १४ मार्च १९९८ रोजी हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

दादांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वावर दुःखाचा डोंगर कोसळला. प्रेक्षकांना खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या या सम्राटाने अशी अकाली एक्झीट घेतल्याने प्रेक्षकांना मोठा धक्का बसला. त्यांच्या निधनाने मराठी मनोरंजन विश्वाला सुवर्णकाळ दाखवणारा विनोदाचा सम्राट काळाच्या पडद्याआड गेला. मराठी चित्रपट सृष्टीत त्यांच्यासारखा विनोद सम्राट पूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. विनोद सम्राट दादा कोंडके यांना

**जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

# मूर्ती बुद्धाची की देवाची?

इतिहासाच्या पानांवर काही प्रश्न असे असतात, ज्यांची उत्तरे शोधताना वर्तमानाची राजकीय, धार्मिक आणि सामाजिक समीकरणेही हादरतात. तामिळनाडूतील सेलम जिल्ह्यातील पेरीयरी गावातील 'थलावेट्टी मुनियप्पन' मंदिरातील मूर्तीबाबत मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय असाच एका मोठ्या प्रश्नाला स्पर्श करून जातो. ही मूर्ती हिंदू देवतेची नसून भगवान बुद्धांची असल्याचे पुरातत्त्वीय तपासणीत निष्पन्न झाले आणि न्यायालयाने त्या निष्कर्षाला गांभीर्याने घेतले. मात्र या प्रकरणाचा अर्थ केवळ 'एक मंदिर बुद्धविहार ठरले' एवढाच काढणे धोकादायक ठरेल. याचा खरा अर्थ आहे, सत्य कोणत्याही श्रद्धेपेक्षा मोठे असते आणि पुरावा कोणत्याही पूर्वग्रहापेक्षा श्रेष्ठ असतो. मद्रास उच्च न्यायालयासमोर प्रश्न आला तो एका मूर्तीच्या ओळखीचा. बुद्ध ट्रस्टने दावा केला की पेरीयरी येथील मूर्ती मूळतः बुद्धांची आहे; कालांतराने तिची ओळख बदलली गेली आणि तिची पूजा 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणून सुरू झाली. राज्य



सरकारकडून मात्र या ठिकाणी दीर्घकाळापासून स्थानिक लोक पूजा करीत असल्याचा युक्तिवाद करण्यात आला. म्हणजेच एका बाजूला परंपरा आणि दुसऱ्या बाजूला इतिहास व पुरातत्त्वीय पुरावे उभे होते.

न्यायालयाने भावनेच्या आधारावर निर्णय दिला नाही. उलट पुरातत्त्व विभागाला मूर्तीची तपासणी करण्याचे निर्देश दिले. तज्ज्ञ समितीने मूर्तीची तपासणी करून तिच्या शिल्पवैशिष्ट्यांचा अभ्यास केला. मूर्ती अर्धपद्मासनात बसलेली असून हात ध्यानमुद्रेत आहेत. कुरळे केस, उष्णीष आणि लांब कानपाळी यांसारखी बुद्धमूर्तीची वैशिष्ट्ये त्यात आढळली. उपलब्ध पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक पुराव्यांचा अभ्यास करून समितीने या मूर्तीमध्ये बुद्धांच्या अनेक 'महापुरुष लक्षणांचा' समावेश असल्याचे मत नोंदवले. इथेच न्यायपालिकेची खरी भूमिका अधोरेखित होते. न्यायालयाने कोणाची श्रद्धा जिंकली किंवा हरवली नाही, न्यायालयाने पुराव्याला बोलू दिले. ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताने निर्णय घेणे नव्हे. लोकशाही म्हणजे अल्पसंख्याकांच्या अधिकारांचे संरक्षण, ऐतिहासिक सत्याचा आदर, संस्थात्मक स्वायत्तता आणि संविधानाच्या चौकटीत न्याय देणे. एखाद्या ठिकाणी शंभर वर्षे एखाद्या नावाने पूजा झाली म्हणून त्या मूर्तीची मूळ ओळखही तीच असली पाहिजे, असे विज्ञान सांगत नाही. परंपरा महत्त्वाची आहे; पण परंपरेला सत्याचा पर्याय बनविता येत नाही.

न्यायमूर्ती एन. आनंद वेंकटेश यांनी पुरातत्त्व विभागाच्या अहवालानंतर मूर्तीला 'थलावेट्टी मुनियप्पन' म्हणूनच पाहणे योग्य ठरणार नाही, अशी भूमिका घेतली. 'चुकीची ओळख' कायम ठेवता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मूर्तीचे मूळ स्वरूप पुनर्स्थापित करण्याचे निर्देश देतानाच तिचा ताबा हिंदू धार्मिक आणि धर्मादाय निधी विभागाऐवजी पुरातत्त्व विभागाकडे देण्याचे निर्देश देण्यात आले. बुद्ध म्हणून मूर्तीची ओळख दर्शविणारा फलक लावण्याचे आणि मूर्तीवर पूजा किंवा इतर धार्मिक विधी न करण्याचे निर्देशही देण्यात आले. या निर्णयावर मतभेद असू शकतात आणि असायलाही हवेत. कारण लोकशाहीत न्यायालयाच्या निर्णयावर चिकित्सक चर्चा करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. मात्र पुराव्याच्या आधारे घेतलेल्या न्यायालयीन निर्णयाला केवळ धार्मिक चष्म्यातून पाहून न्यायपालिकेवरच संशय घेणे ही लोकशाहीसाठी धोकादायक वाटचाल ठरू शकते. आज प्रश्न बुद्धाचा नाही, हिंदूंचाही नाही तर प्रश्न आहे, सत्याचा मालक कोण? सत्याचा मालक ना बहुसंख्य समाज असतो, ना अल्पसंख्याक. सत्याला ना जात असते, ना धर्म. पुरातत्त्वीय पुरावा काही वेगळे सांगत असेल तर त्याची तपासणी करणे, त्यावर प्रश्न उपस्थित करणे आणि त्याचे शास्त्रीय खंडन करणे, हे सर्व लोकशाहीत मान्य आहे. पण पुरावा नाकारून केवळ श्रद्धेच्या नावावर इतिहास ठरविणे ही वैज्ञानिक आणि लोकशाही वृत्ती ठरू शकत नाही.

भारतीय समाजाचा इतिहास अनेक प्रवाहांच्या संगमातून तयार झाला आहे. बौद्ध, जैन, हिंदू आणि विविध लोकपरंपरांनी या भूमीला समृद्ध केले आहे. अनेक प्राचीन स्थळांची ओळख काळानुसार बदलली. काही परंपरा एकमेकांत मिसळल्या. काही प्रतिमा नव्या धार्मिक संदर्भात स्वीकारल्या गेल्या. त्यामुळे इतिहासाचा शोध घेताना भावनिक घोषणा नव्हे, तर शास्त्रीय संशोधन आणि पुराव्यांची कसोटी आवश्यक आहे आणि म्हणूनच या प्रकरणात न्यायपालिकेची भूमिका महत्त्वाची ठरते. न्यायालय हे बहुमताच्या भावनेचे व्यासपीठ नाही तर ते संविधानाचे संरक्षक व्यासपीठ आहे. जर एखाद्या नागरिकाला किंवा संस्थेला वाटत असेल की एखाद्या ऐतिहासिक वस्तूची, स्थळाची किंवा प्रतिमेची ओळख चुकीची आहे, तर त्याला न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा अधिकार आहे. त्या दाव्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. पुरातत्त्वीय तज्ज्ञांचे मत घेतले पाहिजे. पुरावे तपासले पाहिजेत. दोन्ही बाजू ऐकल्या पाहिजेत आणि त्यानंतर न्यायालयाने निर्णय दिला पाहिजे. हीच संविधानिक लोकशाहीची खरी ताकद आहे.

या निर्णयाकडे 'एका धर्माचा विजय आणि दुसऱ्या धर्माचा पराभव' म्हणून पाहणे म्हणजे त्याच्या व्यापक संदेशाचे नुकसान करणे होय. बुद्धांनी सांगितलेला मार्ग प्रज्ञेचा, करुणेचा आणि सत्यशोधाचा होता. त्यामुळे बुद्धमूर्तीची ओळख पटविताना न्यायालयाने पुराव्याला दिलेले महत्त्व हे बुद्धांच्या विचारांशीही सुसंगत वाटते. मात्र या निर्णयातून आणखी एक मोठा प्रश्न उभा राहतो. देशातील अशा किती प्राचीन मूर्ती, लेणी, स्थळे आणि शिल्पांची ओळख आजही अज्ञानाच्या धुक्यात आहे? त्यासाठी प्रत्येक धार्मिक स्थळावर न्यायालयीन वाद निर्माण करण्याची गरज नाही. केंद्र आणि राज्य सरकारांनी पुरातत्त्व तज्ज्ञ, इतिहासकार, शिल्पकला अभ्यासक आणि संबंधित समुदायांच्या प्रतिनिधींच्या सहभागातून वैज्ञानिक दस्तऐवजीकरण करायला हवे. इतिहास हा राजकीय घोषणांचा विषय न बनता संशोधनाचा विषय राहिला पाहिजे. कारण इतिहासाला हात लावला की वर्तमान पेटते; पण इतिहास समजून घेतला तर भविष्य उजळते.

आज सोशल मीडियाच्या काळात न्यायालयीन निर्णयांचे अर्धवट अर्थ काढून धार्मिक संघर्ष निर्माण करणे सोपे झाले आहे. 'हिंदू मंदिर बौद्ध मंदिर झाले', 'हिंदू धर्मावर आघात झाला', 'बुद्धांची स्थळे हिसकावली' अशा टोकाच्या भूमिका समाजात फूट पाडू शकतात. प्रत्यक्षात या प्रकरणातील न्यायालयीन आदेशाचा केंद्रबिंदू होता, पुरातत्त्वीय निष्कर्ष आणि त्या निष्कर्षानुसार मूर्तीची योग्य ओळख. म्हणून या प्रकरणातून भारतीय समाजाने एक धडा घ्यायला हवा. श्रद्धा जपा, पण सत्याला घाबरू नका.(परंपरेचा सन्मान करा, पण पुराव्याला दाबू नका. धर्मावर प्रेम करा, पण न्यायालयाचा अवमान करू नका. (इतिहासाचा अभिमान बाळगा, पण इतिहासाची मोडतोड करू नका. न्यायपालिकेने दिलेला प्रत्येक निर्णय अंतिम सत्य असेलच असे नाही. त्यावर अपील करता येते, पुनर्विचार मागता येतो आणि कायदेशीर मार्ग उपलब्ध असतात. पण निर्णय संविधानिक प्रक्रियेतून आला असेल, तर त्याचा आदर करणे ही लोकशाहीची किमान शिस्त आहे. कारण न्यायालये चुकू शकतात, सरकारे चुकू शकतात, समाजही चुकू शकतो. पण चूक दुरुस्त करण्यासाठी स्वतंत्र न्यायपालिका, मुक्त चर्चा आणि संविधानिक व्यवस्था जिवंत ठेवणे, हीच लोकशाहीची खरी सुरक्षा आहे.

सेलमच्या त्या मूर्तीसमोर आज एक प्रश्न उभा आहे, ती बुद्धाची आहे की मुनियप्पनची? पुरातत्त्वीय पुराव्यांनी न्यायालयाला एक उत्तर दिले आहे. पण भारतीय लोकशाहीसमोर त्याहून मोठा प्रश्न उभा राहतो. आपण सत्य समोर आले तर ते स्वीकारण्याइतके प्रगल्भ आहोत का? या प्रश्नाचे उत्तरच आपल्या लोकशाहीच्या परिपक्वतेचे खरे मोजमाप ठरेल. म्हणून हा निर्णय केवळ एका मूर्तीच्या ओळखीचा निर्णय नाही. तर हा निर्णय आहे, पुराव्याचा विजय की पूर्वग्रहाचा? संविधानाचा आवाज की जमावाच्या भावनेचा? न्यायाचा मार्ग की धार्मिक राजकारणाचा?उत्तर आपणच ठरवायचे आहे. कारण बुद्ध असोत, मुनियप्पन असोत किंवा कोणत्याही श्रद्धेचे प्रतीक असो. सत्याला धर्म नसतो,(न्यायाला जात नसते आणि संविधानाला बहुसंख्य-अल्पसंख्य असा भेद नसतो. याच मूल्यांवर लोकशाही उभी आहे. म्हणूनच न्यायपालिकेचे स्वातंत्र्य जपणे, न्यायालयीन प्रक्रियेवर विश्वास ठेवणे आणि पुराव्यावर आधारित निर्णयांचा सन्मान करणे ही कोणत्याही एका धर्माची बाजू नसून. ही भारतीय संविधानाची, भारतीय लोकशाहीची आणि सत्याच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका आहे.

**- प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो. क्र. ९९२३६२०९१९**

## पत्रे...

तडतड नाचती थेंब
धड धड करती पत्रे
रे अस्तित्वाची खूण
झोपडीवरी ही छत्रे

सुसाटघुसते वादळ
काळीज माझे भित्रे
कोसळेलं बाबाछत
भुंकाय लागले कुत्रे

जमिनीवरी निजता
मोजे आकाशी चित्रे
तळे करुन ठेवणारं
रे ढगांचे पोरटे मुत्रे

अनुदान गुमान बसे
सरकारां पाठवे पत्रे
हेलपाटे मारेम्हातारे
दुखायं लागली गात्रे

पाहून गेला तलाठी
कितीदा करे खातरे
चुकीचा शेरा देऊन
करु नको बा घातरे

कशी देऊ चिरीमिरी
पुरती फाटली धोतरे
येवून गेला आमदार
म्हणतोहलवतो सुत्रे

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक ... बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# नवयुग विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,ठाणे

## ✻ २९ व्या अधिमंडळ वार्षिक बैठकीची सूचना ✻

**(फक्त सभासदांकरीता)**

नवयुग विकास नागरी सहकारी पतपेढी मर्यादित ठाणे, या संस्थेच्या सभासदांची २९ वी अधिमंडळ वार्षिक बैठक संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. वसंत धोंडीबा दळवी यांचे अध्यक्षतेखाली रविवार, दिनांक २३ ऑगष्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता, श्रीमती जानकीबाई कृष्णा मढवी हॉल, जी.पी.पारसिक बँकेसमोर, सेक्टर ५, ऐरोली, नवी मुंबई- ४००७०८ येथे आयोजित केली आहे, सदर बैठकीत खालील विषयांवर चर्चा करण्यात येईल. तरी संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांनी बैठकीस वेळेवर उपस्थित रहावे हि नम्र विनंती.

## ✻ बैठकीपुढील विषय ✻

१. दिनांक २७ जुलै २०२५ रोजी झालेल्या २८ व्या अधिमंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि.३१ मार्च २०२६ अखेरचा कामकाजाचा वार्षिक अहवाल, नफातोटा व ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे.
३. वैधानिक लेखापरिक्षकानी प्रमाणित केलेल्या लेखापरिक्षण अहवालाचे वाचन करणे व मंजूरी देणे.
४. सन २०२५-२०२६ सालाकरीता संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मंजूरी देणे.
५. सन २०२६-२०२७ सालाकरीताच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६. सन २०२६-२०२७ सालाकरीता मा.निबंधकानी जाहिर केलेल्या पॅनलमधील पात्र वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे.
७. मागील लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
८. प्रशिक्षण, कर्ज वसुली, गुंतवणूक इत्यादी तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
९. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
१०. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांनी निर्देशित केलेला सुधारित आदर्श उपविधी सन २०२५ दुरूस्तीसह स्विकृती करणे.
११. नवीन शाखा प्रस्तावास मान्यता देणे.
१२. संस्थेच्या २९ व्या अधिमंडळ वार्षिक बैठकीस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३. मा.अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**स्थळ : ठाणे**
दि.०८/०८/२०२६

**संचालक मंडळाच्या आदेशाने**
**श्री. रविंद्र तुकाराम दळवी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रभारी)**

**-: विशेष सूचना :-**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. सभासदांना सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी सभेच्या सात दिवस आधी लेखी सूचना संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत द्याव्यात, आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३. सभासदांनी सभेला येताना अहवाल सोबत आणावा.

# संदिप येवले यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार जाहीर

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०७, मुंबई :** घाटकोपर पश्चिम भटवाडी येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेचे क्रीडा शिक्षक संदिप बाबुराव येवले यांना अक्षराज मीडिया मार्फत सन २०२६-२७ या वर्षाचा राज्यस्तरीय आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून, शुक्रवार दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



संदिप येवले हे गेली अनेक वर्षापासून क्रीडा शिक्षक म्हणून कार्य करत असून त्यांनी तायक्वांदो, कबड्डी, खो-खो या खेळ प्रकारात अनेक खेळाडू घडविले असून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून अनेक पदके जिंकली आहेत. महाविद्यालयीन खेळाडूंना देखील मार्गदर्शन करून ऑल इंडिया विद्यापीठ स्पर्धेत यश मिळवून दिले आहे.

संदिप येवले यांना या अगोदर अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून महाराष्ट्र शासनातर्फे २००८ मध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी,मुंबई उपनगर यांच्या वतीने गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, २०१७ मध्ये कोरिया देशाचा कुक्किवॉन अवॉर्ड, तर २०१९ मध्ये पै. खाशाबा जाधव पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्काराबद्दल शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांकडून त्यांना अभिनंदनात्मक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# वृक्ष लागवडीसोबतच पाण्याचा प्रश्नही सुटणार !

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा ठाणे :** पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांच्या सुविधांसाठी प्रभाग क्र. २९ मधील फडकेपाडा येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात आज मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली. यावेळी महाविद्यालय परिसरात सुमारे २०० वृक्षांची लागवड करून महाविद्यालयाला पाण्यासाठी २ कूपनलिका उभारून देण्याचे आश्वासन देण्यात आले.

दि.०७/०८/२०२६ रोजी झालेल्या या उपक्रमाचे उद्घाटन नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांच्या हस्ते झाले. गेल्या अनेक दिवसांपासून प्रभागात सुरू असलेल्या वृक्षलागवड मोहिमेला यानिमित्ताने आणखी गती मिळाली आहे.



महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पाण्याची होणारी अडचण लक्षात घेऊन आगामी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात निधीतून २ कूपनलिका उभारून देणार असल्याचे आश्वासन यावेळी नगरसेवक बाबाजी पाटील आणि नगरसेविका अर्चना पाटील यांनी दिले. हा उपक्रम लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न राहील, असेही ते म्हणाले.

मान्यवर उपस्थित

या उपक्रमावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता प्रा. पाटील सर, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आकाश पाटील, दत्तूमामा, नाना मोकाशी, संजय लाऊट यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

वृक्षलागवडीमुळे परिसराचे तापमान कमी होण्यास मदत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# महाबळेश्वरच्या पावसाचे द्विशतक पूर्ण; निसर्गसौंदर्याने फुलले महाबळेश्वर

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०७, महाबळेश्वर :** पावसाचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमध्ये यंदाच्या पावसाने २०० इंचांचा टप्पा पार केला आहे. जून महिना तुलनेने कोरडा गेल्यानंतर जुलैपासून पावसाने दमदार हजेरी लावत संपूर्ण परिसराला हिरवागार साज चढवला. ७ ऑगस्टपर्यंत महाबळेश्वरमध्ये तब्बल २०० इंच पावसाची नोंद झाली आहे.

सततच्या मुसळधार पावसामुळे येथील प्रसिद्ध वेण्णा लेक दुथडी भरून वाहत असून, अंबेनळी घाट धुक्याच्या दुलईत हरवला आहे. तसेच प्रसिद्ध लिंगमळा धबधबा पूर्ण क्षमतेने प्रवाहित होत असल्याने पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

डोंगर-दऱ्या, दाट जंगल आणि हिरवाईने नटलेला परिसर जलमय झाला असून, सर्वत्र निसर्गाचे मनमोहक रूप पाहायला मिळत आहे. धुक्याची चादर, रिमझिम पाऊस आणि धबधब्यांचे विहंगम दृश्य अनुभवण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने महाबळेश्वरमध्ये दाखल होत असून, या आल्हाददायक वातावरणाचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.




पावसाळी पर्यटनाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी पर्यटक गरमागरम भाजलेले चणे, मकई (भुट्टा) आणि प्रसिद्ध मकई पॅटीस यांचा आस्वाद घेत आहेत. रंगबेरंगी रेनकोट परिधान करून, हातात छत्री घेत पावसाच्या सरींमध्ये फिरण्याचा आणि महाबळेश्वरच्या थंडगार, धुक्याने वेढलेल्या वातावरणाचा आनंद पर्यटक मनसोक्त घेताना दिसत आहेत.

यंदाच्या पावसामुळे महाबळेश्वरचे निसर्गसौंदर्य अधिक खुलून आले असून, पर्यटन व्यवसायालाही नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र दिसत आहे. सलग कोसळणारा पाऊस, धुक्याने वेढलेले डोंगर, खळाळणारे धबधबे आणि हिरवाईने नटलेली निसर्गरम्य दृश्ये अनुभवण्यासाठी राज्यासह देशभरातून पर्यटक महाबळेश्वरकडे आकर्षित होत आहेत.

# इंदिरा गांधी नगरच्या विकासाला दूरदृष्टीची गरज!

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०७, माथेरान :** माथेरान नगरीत प्रवेश करताना सर्वप्रथम लागणारा परिसर म्हणजे इंदिरा गांधी नगर. या परिसराचा काही भाग प्रभाग क्रमांक १ तर काही भाग प्रभाग क्रमांक २ मध्ये येतो. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत येथून एकूण चार नगरसेवक निवडून आले असून, त्यामध्ये दोन महिला व दोन पुरुष नगरसेवकांचा समावेश आहे. नगराध्यक्षपदाची जबाबदारीही या परिसरातील प्रतिनिधीकडे आहे. त्यामुळे एवढे मोठे लोकप्रतिनिधित्व मिळालेल्या इंदिरा गांधी नगरचा विकासही त्याच ताकदीने होणे अपेक्षित आहे. विद्यमान बॉडी मध्ये इंदिरानगर चे पाच नगरसेवक आहेत विशेष म्हणजे हे सर्व लोकप्रतिनिधी स्थानिक असल्याने येथील समस्या त्यांना चांगल्या प्रकारे माहिती आहेत.

नवनिर्वाचित नगरसेवकांकडून सुरू असलेल्या छोट्या-मोठ्या कामांचे स्वागत आहे. मात्र रस्ते, पाणी आणि लाईट या मूलभूत सुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. सत्ता कोणाची होती किंवा नव्हती, तरी नागरिकांना या सुविधा मिळणे अपेक्षितच आहे. त्यामुळे केवळ या कामांचे श्रेय घेण्यापेक्षा नगरसेवकांनी आपल्या प्रभागासाठी त्यापलीकडे काय करता येईल, याचा विचार करणे गरजेचे आहे.

नगरसेवक म्हणून आपला ठसा उमटवायचा असेल तर दूरदृष्टीचा विकास आवश्यक आहे. जुनी विहीर उपयोगात आणणे, मायरा पॉइंट परिसरातील नैसर्गिक झऱ्याचा वापर करणे, अंतर्गत रस्त्यांची सुधारणा, ई-रिक्षा थांबा, मध्य रेल्वेकडे रेल्वे थांब्यासाठी पाठपुरावा, तसेच रेल्वे मार्गाच्या पलीकडील मोकळ्या जागेत वॉकिंग ट्रॅक, व्यायामाचे साहित्य व बाके उभारणे अशा सुविधा निर्माण करता येतील.

मायरा पॉइंटकडे जाणाऱ्या मार्गाचे सुशोभीकरण, सेल्फी पॉइंट व दिशादर्शक फलक, तसेच गुरांचा दवाखाना आणि घोड्यांच्या तबेल्याची सुधारणा याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. इंदिरानगरमध्ये मोठ्या प्रमाणात घरे लॉजिंग-बोर्डिंगच्या स्वरूपात विकसित होत आहेत. त्यामुळे या भागाचा पर्यटनपूरक विकास होणे गरजेचे आहे. पर्यटकांसाठी स्थानिक कला-संस्कृतीचे कार्यक्रम, मुलांसाठी खेळाची सुविधा,




निसर्ग वॉक, सुरक्षित मनोरंजनाची जागा यांसारख्या कायम स्वरूपी सुविधा निर्माण करता येतील का, याचा विचार झाला पाहिजे. पर्यटकांना येथे राहण्याबरोबरच पुन्हा येण्याचे कारण निर्माण झाले पाहिजे.

इंदिरानगरमधील अनेक घरांना नगरपालिका पावत्या व भाडे आकारते; मात्र त्याच घरांवर 'अनधिकृत' असा शिक्का कायम आहे. हा प्रश्न सत्ताधारी-विरोधक असा न पाहता सर्व नगरसेवकांनी नगराध्यक्षांसह एकत्र येऊन कायदेशीर व प्रशासकीय मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विकासामध्ये नागरिकांचाही सहभाग असावा. वर्षातून किमान दोन वेळा स्थानिक चर्चासत्र घेऊन नागरिकांच्या सूचना, कल्पना आणि भविष्यातील गरजा जाणून घ्याव्यात. प्रत्येक सूचना लगेच प्रत्यक्षात येईलच असे नाही; मात्र योग्य सूचना ठरावाच्या माध्यमातून नोंदवून ठेवल्यास आजची कल्पना उद्याच्या विकासाचे बीज ठरू शकते.

नगरसेवकांचा कार्यकाळ मर्यादित असतो. त्यामुळे सर्व कामे त्याच काळात पूर्ण होतीलच असे नाही. मात्र प्रस्ताव तयार करून, निधीसाठी पाठपुरावा करून आणि कामाची पायाभरणी करून ठेवणे हीसुद्धा मोठी कामगिरी आहे. त्यामुळे पाचही नगरसेवक आणि नगराध्यक्षांनी पक्षभेद बाजूला ठेवून 'इंदिरानगर विकास आराखडा' तयार करावा. नागरिक तुमच्या पाठीशी आहेत. रस्ते, पाणी आणि लाईट ही प्रशासनाची जबाबदारी; पण प्रभागाला नवी ओळख देणे ही लोकप्रतिनिधींची खरी कामगिरी आहे. आजचा विचार उद्याचा विकास घडवू शकतो आणि आज पेरलेले बीज उद्या नक्कीच उगवणार आहे.

# मनसेच्या दणक्याने आरटीओ ॲक्शन मोडमध्ये!

## अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शासकीय वाहनांवरील काळ्या काचा काढण्याचे आदेश

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा :** सामान्य जनतेला नियम शिकवणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांनीच नियमबाह्य पद्धतीने काळ्या काचा लावलेल्या वाहनांचा वापर सुरू केला होता. ही बाब महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पारनेरचे तालुका अध्यक्ष अविनाश पवार यांनी दि.२९/०७/२०२६ रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे पुराव्यासह तक्रार केली होती.

**मनसेच्या तक्रारीनंतर मोठी कारवाई :** श्री.पवार यांनी आपल्या तक्रारीत स्पष्ट म्हटले होते की, अधिकृत शासकीय वाहनांवर बेकायदेशीरपणे काळ्या रंगाच्या काचा लावल्या आहेत. अशा वाहनांवर तात्काळ कारवाई करून काळ्या काचा काढण्यात याव्यात. अन्यथा मनसे कार्यकर्ते जिथे 'आरटीओ'ची गाडी दिसेल तिथे ती फोडतील.

या कडक भूमिकेची दखल घेत प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहिल्यानगर विनोद सगरे यांनी दि.२८/०६/२०२५ रोजी कार्यालयीन आदेश क्र. ९९२ काढला आहे.

**आदेशात काय आहे?**

१. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व शासकीय वाहनांवरील काळ्या काचा तात्काळ काढून कायदेशीर कारवाई करावी.

२. सर्व तालुकानिहाय मोटर वाहन निरीक्षकांना आदेश देऊन तपासणी करून दोषी वाहनांवर मोटर वाहन कायद्यानुसार कारवाई करण्याचे निर्देश.

३. केलेल्या कारवाईचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करण्याचे आदेश.

**अविनाश पवार म्हणतात...**

सामान्य माणसाला हेल्मेट, सीट बेल्टसाठी दंड करणारे अधिकारी स्वतः नियम तोडत होते. मनसेने आवाज उठवल्यानंतर आरटीओ ला कारवाई करावीच लागली. हे सत्याच्या विजयाचे पहिले पाऊल आहे. पुढे सुपा MIDC मधील अवैध उत्खन प्रकरणी पण आम्ही असेच दणके देऊ

**मनसेचा इशारा :** १५ दिवसात सर्व वाहनांवरील काळ्या काचा न काढल्यास संपूर्ण जिल्ह्यात मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल.

# दुचाकी व क्रेन च्या अपघातात एकाचा मृत्यू एक गंभीर

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.०७, शिरपूर (धुळे) :** शिरपूर शहरात झालेल्या क्रेन व दुचाकीच्या अपघातात वडिलांचा मृत्यू झाला आहे. तर मुलगा गंभीर जखमी झाला आहे. गंभीर जखमी झालेल्या मुलाला धुळे येथे उपचारासाठी नेण्यात आले आहे.

दिनांक ७ रोजी सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास नामदेवसिंग रुपसिंग राजपूत वय ६० व त्यांचा मुलगा श्याम नामदेवसिंग राजपूत वय ३२ हे दुचाकीवर मांडळ कडून शिरपूर शहरात जात होते. यावेळी मांडळ गावाकडून वरवाडे कडे जात असतांना रस्त्यावर तिकडून येणाऱ्या हायड्रा क्रेन ला भीषण अपघात झाला. अपघातात नामदेवसिंग यांचा जागीच मृत्यू झाला. तर श्याम राजपूत हा गंभीर जखमी झाला आहे.

दुचाकीने राजपूत पिता पुत्र हे जात असतांना अहिल्या लॉन्स कडून येत असलेल्या भाऊ क्रेन सर्व्हिस चा हायड्रा क्रेन ने जोरदार धडक दिली. यात नामदेवसिंग राजपूत यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर श्याम राजपूत यांना डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने धुळे येथे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

नामदेवसिंग राजपूत हे यावल तालुक्यातील हिंगोणा येथील रहिवासी आहेत. ते शहरातील मांडळ शिवारात राहतात.

# हक्काच्या भूखंडासाठी प्रकल्पग्रस्तांचा एल्गार; सिडकोविरोधात बेमुदत धरणे आंदोलन

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०७, पनवेल :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने सिडको भवन प्रवेशद्वारासमोर प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांसाठी 'बेमुदत धरणे आंदोलन - २०२५' सुरू करण्यात आले आहे. आंदोलनाला प्रकल्पग्रस्त नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, उरण तालुक्यातील द्रोणागिरी परिसरातील सुमारे ८०० प्रकल्पग्रस्तांना सन २००७ पासून आजतागायत त्यांच्या हक्काच्या भूखंडाचा प्रत्यक्ष ताबा मिळालेला नाही. अनेक प्रकल्पग्रस्तांनी सिडकोसोबत आवश्यक सर्व व्यवहार आणि कागदपत्रांची पूर्तता करूनही भूखंडाचा ताबा देण्यात आलेला नसल्याचा आरोप करण्यात आला. ज्या नोडमध्ये जागा उपलब्ध असेल त्या नोडमध्ये तातडीने भूखंडाचा ताबा द्यावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

याशिवाय, गरजेपोटी उभारण्यात आलेली घरे अनधिकृत ठरविण्याऐवजी त्यांचे नियमितीकरण करून मालकी हक्क द्यावा, तसेच प्रकल्पग्रस्तांवर लादण्यात आलेले वाढीव पेमेंट तात्काळ रद्द करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.



यावेळी प्रकल्पग्रस्त संजय ठाकूर यांनी सिडकोच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, सिडको बिल्डरांना भूखंड देताना सर्व प्रकारच्या कागदपत्रांची पूर्तता करून तातडीने भूखंड उपलब्ध करून देते. मात्र, प्रकल्पग्रस्त जेव्हा स्वतःच्या हक्काची जमीन मागतो, तेव्हा 'प्लॉट तयार नाही', 'खारपुटीची जमीन आहे' अशा विविध कारणांचा आधार घेत टाळाटाळ केली जाते. आमच्या कुटुंबातील चौथी पिढी या न्यायासाठी संघर्ष करत आहे, तरीही आम्हाला हक्काचा भूखंड मिळालेला नाही. कागदोपत्री भूखंड मंजूर झाले असले तरी प्रत्यक्ष ताबा अद्याप देण्यात आलेला नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या बेमुदत धरणे आंदोलनात अधिकाधिक प्रकल्पग्रस्तांनी सहभागी होऊन संघर्षाला बळ द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. भूखंडाचा तातडीने ताबा, घरांचे नियमितीकरण, मालकी हक्क आणि वाढीव पेमेंट रद्द या प्रमुख मागण्या पूर्ण होईपर्यंत आंदोलन सुरू राहणार असल्याचे आंदोलनाच्या आयोजकांनी स्पष्ट केले.

# वढोलीच्या १,०४४ ग्रामस्थांचा दारू दुकानाला एकमुखी विरोध...

**अक्षराज : संतोष बंडुरकर**

**दि.२६, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** गोंडपिपरी तालुक्यातील वढोली गावाने दारू दुकान विरोधात आपल्या लढ्याचा आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेली विशेष ग्रामसभा तब्बल १० तास चालून रात्री ९ वाजता संपली. कडक उन्हाची पर्वा न करता तसेच सायंकाळच्या पावसातही ठामपणे उपस्थित राहिलेल्या हजाराहून अधिक ग्रामस्थांनी गावात सुरू करण्यात आलेले दारू दुकान कायमस्वरूपी बंद करण्याच्या बाजूने एकमुखी कौल दिला. अखेर ग्रामसभेत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला. वढोली येथे सुरू करण्यात आलेल्या दारू दुकानाविरोधात गेल्या काही दिवसांपासून ग्रामस्थांचा संघर्ष तीव्र

झाला होता. शुक्रवार, दिनांक २६ जून २०२६ रोज सायंकाळी ४ वाजता सुरू झालेले रस्ता रोको आंदोलन शनिवार, दिनांक २७ जून २०२६ रोजी पहाटे २ वाजेपर्यंत, म्हणजे तब्बल १० तास सुरू होते. या आंदोलनामुळे गोंडपिपरी – मूल मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. सुमारे ५०० महिला, पुरुष, युवक व नागरिकांनी आंदोलनात सहभागी होत, प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा बोलावली होती.

ग्रामसभे दरम्यान गावातील सामाजिक कार्यकर्ते व युवकांनी लोकवर्गणीतून भोजनाची व्यवस्था केली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत सामाजिक एकजुटीचे दर्शन घडविले. गावातील सर्व प्रतिष्ठाने बंद ठेवून नागरिकांनी ग्रामसभेला प्राधान्य दिले. विशेष ग्रामसभेत गावातील एकूण १,६१४ मतदारांपैकी १,०४४ मतदारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून दारू दुकान हटविण्याच्या बाजूने लेखी स्वाक्षरीद्वारे आपले मत नोंदविले. प्रत्येक मतदाराची आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्राच्या आधारे पडताळणी करण्यात आली. त्यामुळे गावातील बहुसंख्य नागरिकांचा दारू दुकानाला ठाम विरोध असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले.

ग्रामसभा दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यातआला होता. संपूर्ण प्रक्रिया शांततेत पार पडल्याने प्रशासनानेही समाधान व्यक्त केले.दरम्यान, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपविभागीय दंडाधिकारी अर्जुन पावरा यांनी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम १४२(२) अन्वये वढोली येथील एस.के.बार अँड रेस्टॉरंट हे दारू दुकान २० जून ते ३० जून २०२६ या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मात्र हा निर्णय तात्पुरता असल्याने ग्रामस्थांनी दारू दुकान कायमस्वरूपी हटविण्याची मागणी कायम ठेवली आहे. विशेष ग्रामसभेला संवर्ग विकास अधिकारी संजय पुप्पलवार, ठाणेदार रमेश हत्तीगोटे, उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक अभिनंदन कांबळे, दुय्यम निरीक्षक सी. टी. दरोडे, अतुल भिवगडे, जगदीश कापटे, नायब तहसीलदार शेखर वेटे, विस्तार अधिकारी जीवन प्रधान, मंडळ अधिकारी सुकेसनी कांबळे, तलाठी अश्विनी शेळके, पोलिस उपनिरीक्षक मंगेश कराडे तसेच ग्रामसेवक जितेंद्र खोब्रागडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# तुर्भे विभाग कार्यक्षेत्रातील धोकादायक इमारतीतील पाणीपुरवठा व मल:निस्सारण जोडणी खंडीत

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अमोली को.ऑ.हौ.सो. लि., भुखंड क्र.२८, सेक्टर ३०, सानपाडा, नवी मुंबई ही इमारत सन २०१९-२० मध्ये धोकादायक इमारती घोषीत करणेबाबत महापालिका समितीने सी-१ (अतिधोकादायक, रहाण्या अयोग्य तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या) या प्रवर्गामध्ये घोषीत करण्यात आलेली आहे.सी-१ प्रवर्गात मोडत असलेल्या इमारती यापुर्वी धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीचा वापर तात्काळ बंद करुन, धोकादायक इमारत रिकामी करणेबाबत संबंधितास या कार्यालयामार्फत नोटीस बजावण्यात आलेली होती. परंतु, अद्याप सदर धोकादायक इमारतीतील सदनिकांचा निवासी वापरासाठी वापर चालू असल्याचे निदर्शनास आलेले आहे.तसेच सी-१ प्रवर्गात मोडणाऱ्या इमारती निष्कासित/रिकाम्या करणेचे दृष्टीने उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र.११३५/ २०१४ मधील उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इमारतीची विद्युत जोडणी, जल जोडणी व गॅस पुरवठा खंडीत करणेबाबत कळविले आहे.त्याअनुषंगाने, तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात सी-१ या प्रवर्गात अतिधोकादायक, रहाण्यास अयोग्य तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या अमोली को.ऑ.हौ.सो. लि., भुखंड क्र.२८, सेक्टर-३०, सानपाडा, नवी मुंबई या इमारती मधील सदनिकेचा रहिवास वापर बंद करुन त्वरीत रिकामी करणेची कार्यवाही करणेकरीता सदर इमारतीचा पाणीपुरवठा व मल:निस्सारण जोडणी खंडीत करणेची कार्यवाही दि. २३/०६/२०२६ रोजी करण्यात आली. तसेच सदर इमारतीचा वीजपुरवठा खंडीत करणेची कार्यवाही देखील लवकरात लवकर करण्यात येणार आहे.सदर मोहिम आयुक्तांच्या आदेशान्वये अति. आयुक्त राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) संजय शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली व सहाय्यक आयुक्त, तुर्भे सागर मोरे, यांचे नियंत्रणाखाली तुर्भे विभागातील विनोद आंब्रे, कनिष्ठ अभियंता व पाणी पुरवठा व मलनि:स्सारण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थिती मध्ये करण्यात आली आहे.

# शहापूर उपजिल्हा रुग्णालयात पावसाळी आजारांवर नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याची मागणी

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध साथीच्या आजारांचा धोका वाढत असताना, उपजिल्हा रुग्णालयात तातडीने आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. रुग्ण कल्याण समिती सदस्य हेमंत रामचंद्र मोरे यांनी वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय शहापूर यांना निवेदन देत ही मागणी केली आहे. या निवेदनात पावसाळ्यात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, लेप्टोस्पायरोसिस, अतिसार, तसेच इतर संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णालयात आवश्यक औषधे, सलाईन, ऑक्सिजन, तसेच आपत्कालीन उपचारासाठी लागणारी साधनसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध ठेवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

तसेच रुग्णालय परिसरात स्वच्छता राखणे, पिण्याच्या पाण्याची सुरक्षित व्यवस्था करणे, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे यावरही भर देण्यात आला आहे. आपत्कालीन विभाग (Emergency Ward) २४ तास कार्यरत ठेवून अतिरिक्त डॉक्टर, नर्स व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली आहे. गंभीर रुग्णांसाठी ऑक्सिजन बेड, व्हेंटिलेटर, मॉनिटर यांसारख्या जीवनावश्यक उपकरणांची सुविधा वाढविणे, तसेच दुर्गम भागातील रुग्णांना तातडीने सेवा देण्यासाठी अँब्युलन्स व्यवस्था सक्षम ठेवण्याची गरजही निवेदनात नमूद करण्यात आली आहे.पावसाळ्यात नागरिकांना वेळेवर आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी विनंती या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# अमली पदार्थांचे व्यसन - मेंदूला अनियंत्रित करणारे घातक विष

संपूर्ण सजीव सृष्टीमध्ये मनुष्याला सर्वात बुद्धिमान प्राणी मानले जाते आणि त्यामागील प्रमुख कारण म्हणजे त्याचा विकसित मेंदू. मानवी शरीरातील प्रत्येक हालचाल, निर्णय आणि वर्तनाचे नियंत्रण मेंदूद्वारेच केले जाते. मेंदू योग्य प्रकारे कार्य करत नसेल, तर मनुष्याचे अस्तित्व केवळ एका जिवंत शरीरापुरते मर्यादित राहते. दुर्दैवाने, व्यसनाचा सर्वांत जास्त परिणाम याच मेंदूवर होतो. मादक पदार्थांचे सेवन केल्याने व्यक्तीची विचारशक्ती आणि योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता कमी होते. व्यसनाधीन अवस्थेत व्यक्तीचे स्वतःच्या वर्तनावर आणि भावनांवर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे अनेक गुन्ह्यांच्या मुळाशी व्यसनाची भूमिका आढळून येते. व्यसनाची गरज भागविण्यासाठी अनेक जण चोरी, दरोडे, हिंसाचार आणि इतर बेकायदेशीर मार्गांचा अवलंब करतात. आर्थिक अडचणी वाढल्यानंतर परिस्थिती इतकी गंभीर बनते की काही व्यक्ती स्वतःच्या कुटुंबीयांशीही हिंसक वर्तन करू लागतात. अनेकदा प्रसारमाध्यमांत अशा घटना समोर येतात की, व्यसनामुळे कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि निरपराध लोकांचा जीवही जातो.

व्यसन केवळ मेंदूलाच नव्हे तर शरीरातील इतर महत्त्वाच्या अवयवांनाही हळूहळू हानी पोहोचवते. यामुळे अनेक गंभीर आणि खर्चिक आजार उद्भवतात, जे अखेरीस अकाली मृत्यूचे कारण ठरू शकतात. म्हणूनच व्यसन हे कोणत्याही प्रकारे मनोरंजन किंवा मानसिक आरामाचे साधन नसून, जीवन हळूहळू नष्ट करणारे घातक विष आहे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयामार्फत दरवर्षी व्यसनमुक्ती बाबत जनजागृती मोहीम राबविली जाते. यावर्षी १७ जून ते २६ जून २०२६ या कालावधीत 'नशामुक्त सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत देशभर विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यावर्षीची संकल्पना आहे – जागतिक स्तरावरील अमली पदार्थांची समस्या : त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणी, नवीन आव्हाने आणि त्यावरील नवे उपाय.

आज अमली पदार्थ सहज उपलब्ध होत असल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. लहान मुलांपासून युवक आणि ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोक या संकटाच्या विळख्यात अडकताना दिसत आहेत. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार नागपूर शहरात अवघ्या पाच महिन्यांत पाच कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. एका शहरातील ही परिस्थिती असेल, तर संपूर्ण राज्य आणि देशात अमली पदार्थांची तस्करी किती मोठ्या प्रमाणावर होत असेल याची सहज कल्पना करता येते. ही केवळ कायदा आणि सुव्यवस्थेची समस्या नसून देशाच्या भविष्यासाठीही गंभीर धोका आहे. युवकवर्ग हा कोणत्याही राष्ट्राची सर्वांत मोठी ताकद मानला




जातो. जर हाच युवकवर्ग व्यसनाच्या आहारी गेला, तर समाज आणि देशाचा विकास गंभीरपणे प्रभावित होतो. पूर्वी काही लोकांमध्ये व्यसनामुळे थकवा दूर होतो किंवा ताण कमी होतो अशी समजूत होती. त्या काळात शिक्षण आणि मनोरंजनाची साधने मर्यादित होती. मात्र आज शिक्षण, तंत्रज्ञान आणि माहितीची अनेक साधने उपलब्ध असूनही अनेक युवक व्यसनाला आधुनिकता, मौजमजा किंवा प्रतिष्ठेचे प्रतीक समजू लागले आहेत. ही प्रवृत्ती अत्यंत चिंताजनक आहे.

कुटुंबातील एखादी व्यक्ती व्यसनाधीन झाली, तर त्याचे परिणाम संपूर्ण कुटुंबाला भोगावे लागतात. आर्थिक संकट, मानसिक तणाव, सामाजिक अपमान आणि भावनिक वेदना यांचा सामना करावा लागतो. व्यसन व्यक्तीला हळूहळू जबाबदाऱ्या पासून दूर नेत असते. त्यामुळे तो आपल्या कर्तव्यांचे पालन करण्यात



-डॉ.प्रीतम भी.गेडाम
मोबाईल
८२३७४ १७०४१

अपयशी ठरतो आणि इतर कुटुंबीय असुरक्षित व हतबल वाटू लागतात. जर कुटुंबप्रमुखच व्यसनाधीन असेल, तर संपूर्ण कुटुंबाचे भविष्य धोक्यात येते. व्यसन ही केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्या नाही, तर राष्ट्रीय विकासालाही अडथळा ठरणारी गंभीर समस्या आहे. यामुळे गुन्हेगारी, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गरिबी आणि सामाजिक अस्थिरता वाढते. ज्या देशांमध्ये अमली पदार्थांचा व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, तेथे सामाजिक आणि आर्थिक विकासाला मोठा फटका बसलेला दिसून येतो. त्यामुळे व्यसनविरोधातील लढा हा केवळ आरोग्याचा विषय नसून सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारीही आहे.

मुलांना आणि किशोरवयीन मुलांना व्यसनापासून दूर ठेवण्यात पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. केवळ त्यांच्या इच्छा पूर्ण करणे किंवा भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे पुरेसे नसते. मुलांचा सहवास कोणासोबत आहे, ते कुठे वेळ घालवतात आणि कोणत्या उपक्रमांमध्ये सहभागी होतात याची माहिती पालकांना असणे आवश्यक आहे. मुलांच्या वर्तनातील बदल समजून घेऊन योग्य वेळी मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. घरातील वातावरण असे असावे की मुलांना कोणतीही भीती न बाळगता आपले विचार आणि समस्या मांडता याव्यात. पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांच्याशी संवाद साधला, तर त्यांना चुकीच्या मार्गावर जाण्यापासून रोखता येते. मुलांच्या व्यक्तिमत्त्व घडविण्यात कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे त्यांना चांगले संस्कार, नैतिक मूल्ये आणि जीवनदृष्टी देणे आवश्यक आहे.

आज समाजात अनेक अशा घटना घडताना दिसतात, जिथे व्यसनाच्या प्रभावाखाली लोक गंभीर गुन्हे करतात. अशा घटना व्यसनामुळे व्यक्तीची निर्णयक्षमता किती कमी होते याचे स्पष्ट उदाहरण आहेत. त्यामुळे केवळ गुन्हेगाराला दोष देणे पुरेसे नसून, अशा घटना घडण्यामागील सामाजिक परिस्थिती आणि दुर्लक्ष यांचाही विचार करणे आवश्यक आहे. सरकारी आकडेवारीनुसार देशात व्यसनाची सुरुवात होण्याचे सरासरी वय १२ ते १३ वर्षे आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. कोट्यवधी लोक मद्य, गांजा, चरस, ओपिओइड्स आणि इतर अमली पदार्थांचे सेवन करत आहेत. जागतिक स्तरावरही अमली पदार्थांच्या वापरात सातत्याने वाढ होत आहे. अवैध अमली पदार्थांचे उत्पादन आणि तस्करी संघटित गुन्हेगारीला प्रोत्साहन देत असून अनेक देशांसाठी गंभीर आव्हान ठरत आहे.

या समस्येवर मात करण्यासाठी कठोर कायद्यांसोबतच प्रभावी उपचार आणि पुनर्वसन व्यवस्थेचीही गरज आहे. व्यसनाधीन व्यक्तींना वैद्यकीय उपचार, पुनर्वसन आणि भावनिक आधार मिळणे आवश्यक आहे. तणाव, एकाकीपणा, चिंता, सामाजिक दबाव आणि भावनिक अस्थिरता यांसारखी कारणे युवकांना व्यसनाकडे ढकलतात. त्यामुळे त्यांना सकारात्मक जीवनमूल्ये, निरोगी जीवनशैली, आत्मविश्वास आणि मानसिक बळ यांचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. देशभरात व्यसनमुक्ती केंद्रे, पुनर्वसन केंद्रे आणि विविध सहाय्य सेवा उपलब्ध आहेत. 'नशामुक्त भारत अभियान' अंतर्गत १४४४६ हा हेल्पलाइन क्रमांक देखील सुरू करण्यात आला आहे. गरजू व्यक्तींना येथे मदत मिळू शकते.

मानवी जीवन अत्यंत मौल्यवान आहे. ते व्यसनासारख्या विनाशकारी सवयींमध्ये वाया घालवू नये. आपण स्वतः जागरूक राहून इतरांनाही जागरूक केले, तर व्यसनमुक्त समाज आणि निरोगी राष्ट्र उभारण्यात महत्त्वाचे योगदान देऊ शकतो. व्यसन जीवनात सुख, यश किंवा सन्मान आणत नाही. उलट ते व्यक्ती, कुटुंब आणि समाजाला हळूहळू विनाशाच्या दिशेने घेऊन जाते. म्हणूनच आपण सर्वांनी स्वतः व्यसनापासून दूर राहण्याचा आणि इतरांनाही त्यापासून वाचविण्याचा निर्धार केला पाहिजे. हाच निरोगी, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठीचा सर्वांत भक्कम पाया आहे.

# पत्रकारितैवरचा 'हल्ला'

विधानसभा, लोकसभा ही लोकशाहीची पवित्र मंदिरे आहेत त्याच बरोबर ते सभागृह कायदेमंडळ देखील आहे. याच कायदेमंडळात कायदे, नियम बनतात, त्यानुसार राज्यकारभार चालतो, घटनेच्या चौकटीत राहून कायद्याचे पालन व्हावे ही सर्वांकडुन अपेक्षा.

आमदार खासदार मंत्री यांच्याकडुन तर ती अधिक आहे. मात्र दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आणि यात बसणाऱ्यांमधे गुंड प्रवृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांचा भरणा दिवसेंदिवस वाढत चालला आहे त्यामुळेच लोकशाहीचे धिंडवडे निघत आहेत, चरित्र कि राजनिती कोणालाच नको आहे. या कायदेमंडळात बसणारेच गुन्हेगाराची, सडक छाप गुंडाची भाषा बोलत आहेत आणि त्याची परिणती समाजजीवनावर विपरित परिणाम करत आहे. नुकतेच मुंबईतील एका खासदाराने पक्षांतर केले या संबधी प्रश्न विचारायला गेलेल्या पत्रकारांना या महाभागाने अर्वाच्य भाषेत धमकी दिली, अगदी पोलिस कमिशनरला सांग असे म्हणत आपल्या कुटुंबाचा कुईतिहास सांगितला. आपण सत्ताधारी पक्षात आलो यामुळे कदाचित त्यांना सत्तेची मस्ती आणि मग्रुरी आली असावी आणि आपण काहीही बोललो तरी आपला पक्ष, सत्ताधारी आघाडी, शासन-प्रशासन आपल्या विरोधात काही कारवाई करणार नाही हा आत्मविश्वास त्यांना असावा म्हणून त्यांनी इतक्या मग्रुरीची भाषा केली आणि हा त्यांचा विश्वास खरा देखील आहे कारण गेल्या काही वर्षांपासून देशात काय किंवा राज्यात काय सत्ताधारी किंवा सत्ताधारी पक्षाशी संबंधित यांच्यासाठी एक न्याय आणि विरोधकांसाठी दुसरा न्याय अशा दुजाभाव अनेकदा अधोरेखित होत आहे. यंत्रणा देखील सत्ताधारी पक्षाची मर्जी राखुन काम करतात यात आता कुठलीच शंका ऊरलीच नाही.

याचमुळे अगदी मंत्रीपदावर राहुन देखील नितेश राणे हे कितीही विद्वेषाची भाषा करत असले किंवा महायुतीतील संजय गायकवाड, संजय बांगर, गोपीचंद पडळकर यांच्या सारख्यांनी कितीही वाचाळपणा केला तरी त्यांना लगाम घातला जात नाही कि कायदेशीर कारवाई केली जात नाही.सत्ताधारी पक्षाचा असला की काहीही बरळता येतो, कुठल्याही पातळीवर जाऊन कुणालाही धमकावता येते, यंत्रणांच्या कारवायांची भिती नसते, वरिष्ठांकडुन अभयदान मिळण्याचा विश्वास असतो म्हणून संजय पाटील यांच्या सारखे पत्रकारांना ऊघणपणे धमकावु शकतात, कोणतीही भाषा वापरु शकतात आणि हे वारंवार घडत आहे. तुम्ही तुमच्या स्वार्थासाठी राजकिय भुमिका घेतात, आर्थिक लाभ मिळवतात मात्र जनता, पत्रकारांनी प्रश्न विचारले की ते तुम्हाला रूचत नाही. लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी काय याचे भान लोकप्रतिनिधींनी ठेवायला हवे कारण जनता त्यांचे अनुकरण करते,




लोकप्रतिनिधी हे समाजाला दिशा देतात त्यांचीच दिशा चुकली तर देश किंवा समाज कसा घडणार?

लोकप्रतिनिधी हे ज्या प्रमाणे जनतेसाठी काम करतात लोकशाहीचा महत्वाचा स्तंभ आहे त्याचप्रमाणे पत्रकारिता हा देखील लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे आणि जनतेचा आवाज शासन प्रशासन, सरकार, लोकप्रतिनिधी यांच्या पर्यंत पोहचविण्याची जबाबदारी माध्यमंची आहे, समाजाचा जागल्याच्या भुमिकेतुन पत्रकार हे आपले कर्तव्य पार पाडत असतात अशावेळी ते प्रश्न विचारणारच आणि त्याची समाधानकारक उत्तरे देणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. खालची पातळी गाठुन बोलणारे संजय पाटील हे केवळ एकच आहे असे नाही तर जवळ जवळ सर्वच राजकीय पक्षांत अशी गावगुंडाची भाषा करणारे अनेक 'संजय 'आहेत. ऊशिराचे शहाणपण सुचले म्हणून अखेर खा. संजय पाटील यांनी माफी मागितली हेही नसे थोडके. मात्र तुमच्या राजकीय भांडणाचा राग पत्रकारांवर काढणे कितपत योग्य आहे?. दुर्दैवाने सत्ताधारी किंवा विरोधक हे कुणालाही आवर घालतांना दिसत नाही. आपला माणुस म्हणुन पाठिशी घातले जाते, शासन-प्रशासन देखील काही कारवाई करत नाही त्यामुळेच असे वाचाळविर सातत्याने वादग्रस्त वक्तव्ये करतात ना कोणाला कायद्याचा धाक ना शिक्षेची भिती राहिली.ज्या प्रमाणे सर्वच श्रेत्राचे राजकियीकरण झाले आहे तसेच पत्रकारिता श्रेत्राचे देखील काही प्रमाणात राजकियीकरण झाले आहे, अनेक पत्रकार हे राजकीय पक्षांचे प्रवक्ते बनले आहेत, राजकिय भुमिकेतुन पत्रकारिता करत आहे, हे देखील कटु वास्तव आहे. असे असले तरी पत्रकारांना मारहाण होणे, प्रसंगी हत्या होणे, अपमानास्पद भाषा वापरली जाणे याचे समर्थन होऊ शकत नाही. सरकारने पत्रकार संरक्षण कायदा बनवला मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी कुठेच होतांना दिसत नाही.कायदेमंडळात बसणारे अशी भाषा पत्रकारांच्या बाबत करू लागले तर सामान्य जनतेचे काय? आजच्या घडीला लोकशाहीच्या संसद, कार्यपालिका,, न्यायव्यवस्था, आणि प्रिंट तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया हे चारही स्तंभ डळमळीत झाले आहेत, हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आणि नुकसानकारकच आहे ही अधिक चिंतेची बाब आहे.

– अनंत बोरसे
शहापूर जिल्हा ठाणे
९१५८४९५०३७

# ड्रंक अँड ड्राईव्हचा थरार... एका कुटुंबाचा वाचलेला संसार...

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.२६, कराड (सातारा) :** कळंत्रेवाडी, ता. कराड गावच्या हद्दीतून जाणाऱ्या पाटण–पंढरपूर राज्य मार्गावर बुधवार दि. २४ जून रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या दरम्यान घडलेली एक घटना समाजातील संवेदनशीलता, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या एका व्यक्तीचा ताबा सुटून तो रस्त्याच्या कडेला कोसळला आणि त्यानंतर जे काही घडले ते आजच्या समाजाचे वास्तव दाखवणारे होते.फोटोमध्ये दिसणारी परिस्थिती अंगावर काटा आणणारी आहे. रस्त्याच्या कडेला एक व्यक्ती पडलेली आहे, बाजूला त्याची दुचाकी उभी आहे आणि आजूबाजूला निर्मनुष्य वातावरण दिसत आहे. ही केवळ एका व्यक्तीच्या अपघाताची घटना नाही, तर दारूच्या व्यसनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि कौटुंबिक संकटाचे जिवंत चित्र आहे.




**दारूच्या नशेत हरवलेले भान**

मिळालेल्या माहितीनुसार संबंधित व्यक्तीने मद्यपान केले होते. नशेच्या भरात दुचाकी चालवित असताना वाहनावरील नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याच्या कडेला जाऊन कोसळला. सुरुवातीला अनेक जण घटनास्थळी जमा झाले. नेहमीप्रमाणे चौकशी झाली, चर्चा झाली, काहींनी अंदाज बांधले. मात्र तो दारूच्या नशेत असल्याचे लक्षात येताच अनेकांनी तिथून काढता पाय घेतला.

ही बाब अत्यंत गंभीर आहे. एखादा व्यक्ती चूक करत असेल, त्याच्या वर्तनाशी आपण सहमत नसू शकतो, परंतु तो संकटात असताना त्याला मदतीचा हात देणे हे माणुसकीचे कर्तव्य आहे. दुर्दैवाने आज अनेक ठिकाणी अपघातग्रस्त व्यक्तीकडे बघ्यांची गर्दी होते, पण मदतीसाठी पुढे येणारे हात फारच कमी असतात.

**वेदनांनी विव्हळणारा माणूस आणि हरवलेली संवेदना...**

सदर व्यक्ती बराच वेळ रस्त्याच्या कडेला पडून होता. वेदनांनी विव्हळत होता. त्याच्या जवळ कोणीही उभे नव्हते. दारू प्यायलेला असल्यामुळे अनेकांनी त्याच्याबद्दल सहानुभूती दाखवण्याऐवजी दुर्लक्ष करणे पसंत केले.

पण प्रश्न असा आहे की, एखादा माणूस दारू पितो म्हणून त्याचा जीव कमी महत्त्वाचा ठरतो का? त्याच्या कुटुंबाचे काय? त्याच्या पत्नीचे काय? त्याच्या मुलांचे काय? त्याची वाट पाहणाऱ्या घरच्यांचे काय?

**सामाजिक बांधिलकीचे जिवंत उदाहरण...**

घटनेची माहिती मिळताच आपण घटनास्थळी धाव घेतली. संबंधित व्यक्तीची विचारपूस केली. त्याची परिस्थिती लक्षात घेऊन तात्काळ पोलीस पाटील जयसिंग येळवे तसेच उंब्रज पोलीस प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला. त्यानंतर संबंधित व्यक्तीच्या गावातील आणि कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला.जोपर्यंत हा व्यक्ती सुरक्षितपणे त्याच्या कुटुंबाच्या ताब्यात जात नाही, तोपर्यंत घटनास्थळ सोडायचे नाही असा निर्धार करण्यात आला. अखेर त्याचे नातेवाईक घटनास्थळी आले आणि त्याला सुरक्षितपणे घरी घेऊन गेले.

**ही घटना केवळ मदतकार्य नव्हती, तर सामाजिक जबाबदारीचे उत्तम उदाहरण होते...**

एका पत्नीचे कुंकू आणि मुलांचा बाप वाचला अनेक वेळा अपघातांमध्ये काही मिनिटांचा विलंबही जीवावर बेतू शकतो. योग्य वेळी मदत मिळाली नसती तर या घटनेचे परिणाम गंभीर होऊ शकले असते.त्या व्यक्तीने चूक केली होती. दारू पिऊन वाहन चालविणे हा गुन्हा आहे. परंतु त्याच्या चुकीची शिक्षा त्याच्या पत्नीला का मिळावी? त्याच्या लहान मुलांना वडिलांच्या छत्रछायेशिवाय का राहावे लागावे?त्यामुळे त्या क्षणी मदत करताना समोर एक दारू पिलेला माणूस नव्हता, तर एका कुटुंबाचा आधारस्तंभ दिसत होता. एका पत्नीचे कुंकू, मुलांचा बाप आणि एका कुटुंबाचा संसार सुरक्षित ठेवण्याची भावना होती.

**ड्रंक अँड ड्राईव्ह : एक सामाजिक अभिशाप...**

दारू पिऊन वाहन चालविणे ही केवळ वैयक्तिक चूक नसून समाजासाठी धोकादायक बाब आहे. अशा प्रकारच्या निष्काळजीपणामुळे अनेक निष्पाप लोकांचे जीव जातात, कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि अनेकांना आयुष्यभर अपंगत्व भोगावे लागते. म्हणून प्रत्येक नागरिकाने दारू पिऊन वाहन चालवणार नाही आणि दुसऱ्यालाही चालवू देणार नाही असा निर्धार करण्याची गरज आहे.

# ‘नशामुक्त महाराष्ट्र’ करण्यासाठी समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक - पो. उपनि. शिंद

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२६, मंडणगड (रत्नागिरी) :** येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व मंडणगड पोलिस स्टेशन यांच्या सहकार्याने ‘नशामुक्त महाराष्ट्र – सुरक्षित महाराष्ट्र’ या जनजागृतीपर कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मंडणगड पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरिक्षक एन. डी. शिंद उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर होते. यावेळी मंडणगड पोलिस ठाण्याचे पोलिस विनय पाटील, विशाल कोळथरकर, उपप्राचार्य डॉ.विष्णू जायभाये, एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप निर्वाण, डॉ. महेश कुलकर्णी, प्रा.अशोक कंठाळे, प्रा.महादेव वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रभारी प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर यांच्या हस्ते प्रमुख मार्गदर्शक पोलीस उपनिरिक्षक एन. डी. शिंद तसेच उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी प्रा. अशोक कंठाळे यांनी प्रास्तावना करताना नशामुक्त महाराष्ट्र बाबत थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर पोलिस विनय पाटील यांनी नशामुक्त महाराष्ट्र – सुरक्षित महाराष्ट करावयाचा असेल तर आपण विद्यार्थी म्हणून कार्य करावे लागले याची थोडक्यात माहिती दिली.



प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना मंडणगड पोलीस उपनिरिक्षक श्री. एन. डी. शिंद म्हणाले की, नशामुक्त महाराष्ट्र व सुरक्षित महाराष्ट्र करण्यासाठी आज समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे. या अमली पदार्थाच्या व्यसनाधिनतेमुळे माणसाची कशी दुरवस्था होते याची माहिती सांगताना व्यसन करणे सोपे आहे परंतु ते सोडणे अतिशय कठीण आहे. समाजामध्ये अमली पदार्थांचे व्यसन रोखणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. अनेकजन अमली पदार्थ व्यसनाच्या आहारी जाऊन नाहक स्वतःचे अमुल्य जीवन उद्धवस्त करतात, म्हणून विद्यार्थ्यांनी या अंमली पदार्थाच्या व्यसनापासून चार हात दूर रहावे असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. वाल्मिक परहर यांनी महाराष्ट्र शासनाव्दारे अंमली पदार्थांचे सेवन आणि व्यसनाधीनता रोखण्यासाठी सुरु केलेले एक व्यापक जानजागृती अभियान असून, आजच्या धकाधक्कीच्या जीवनात युवकांमध्ये व्यसनधिनतेचे प्रमाण वाढत असल्याची बाब चिंताजनक आहे. अशा वेळी त्यांना योग्य मार्गदर्शन करुन अमली पदार्थाच्या आहारी जाऊ नये. यासाठी विद्यार्थी व समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी एन.एस.एस. स्वयंसेवक मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक कंठाळे यांनी तर आभार प्रा. डॉ. महेश कुलकर्णी यांनी मानले.

# वेताळवाडी शिवारात सोयगाव पोलिसांचा मोठा छापा;

## ५७ हजारांच्या गांजासह दोघांना रंगेहाथ पकडले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, सोयगाव :** दुचाकीवरून हळदा मार्गाने सोयगाव शहरात विक्रीच्या उद्देशाने येत असलेल्या दोन आंतर–तालुका गांजा तस्करांना सोयगाव पोलिसांनी वेताळवाडी शिवारात रंगेहाथ अटक केली आहे. ही धडाकेबाज कारवाई २५ जून २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास वेताळवाडी शिवारातील डोंगराच्या पायथ्याशी करण्यात आली. नव्याने रुजू झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात पोलिसांनी डोंगराच्या आडोशाला दबा धरून बसत हा सापळा यशस्वी केला. या कारवाईत आरोपींकडून १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा गांजा आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून सोयगाव पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**डोंगरपायथ्याशी फिल्मी स्टाईल सापळा**

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सोयगाव पोलिसांना त्यांच्या गुप्त बातमीदाराकडून अत्यंत खात्रीशीर माहिती मिळाली होती की, सिल्लोड तालुक्यातील उंडणगाव येथून सोयगावकडे मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांची खेप घेऊन काही जण दुचाकीने



येत आहेत. या माहितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने वेताळवाडी शिवारातील डोंगरपायथ्याशी असलेल्या हळदा मार्गावर मोर्चेबांधणी केली. पोलिसांच्या विशेष पथकाने परिसरातील भौगोलिक परिस्थितीचा अंदाज घेऊन डोंगराच्या आडोशाला दबा धरला. सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास संशयित दुचाकी वेताळवाडी शिवारात येताच पोलिसांनी त्यांना चहूबाजूने वेढून अत्यंत गुप्तता पाळत रंगेहाथ पकडले.

**आरोपींची ओळख आणि जप्त मुद्देमाल**

अटक करण्यात आलेल्या संशयितांची पोलिसांनी सखोल चौकशी केली असता, त्यांची नावे अजगर अली अन्सार अली शहा (वय ४३ वर्षे, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड) आणि पांडुरंग पुंडलिक केळोदे (वय ६५ वर्षे, रा. उंडणगाव, ता. सिल्लोड) अशी असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे तब्बल १ किलो ९०० ग्रॅम वजनाचा ओला–सुका गांजा आढळून आला. आंतरराष्ट्रीय व स्थानिक बाजारपेठेतील मूल्यांकनानुसार या गांजाची किंमत सुमारे ५७ हजार रुपये इतकी आहे. याशिवाय तस्करीसाठी वापरण्यात आलेली ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल (दुचाकी) देखील पोलिसांनी जप्त केली आहे. एकूण १ लाख ७ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दोन्ही आरोपींना पोलीस ठाण्यात आणून रीतसर अटक करण्यात आली.

**फॉरेन्सिक लॅबचे पथक घटनास्थळी दाखल**

अमली पदार्थांची तस्करी आणि व्यावसायिक विक्रीचा हा गंभीर गुन्हा असल्याने, घटनेची अधिकृत कायदेशीर पडताळणी करण्यासाठी रात्री उशिरा छत्रपती संभाजीनगर येथील फॉरेन्सिक लॅबच्या (न्यायालयीन वैज्ञानिक प्रयोगशाळा) विशेष पथकाला पाचारण करण्यात आले होते.

फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी धाव घेऊन जप्त केलेल्या अमली पदार्थांचे रासायनिक नमुने गोळा केले आणि कायदेशीर पंचनामा पूर्ण केला. हा पंचनामा न्यायालयात सबळ पुरावा म्हणून सादर केला जाणार असून, यामुळे गुन्हेगारांना कठोर शिक्षा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास कायदेतज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

# थोडक्यात

## मागणी नसतानाही २४ हजार लिटर रॉकेलचा पुरवठा

### २ महिन्यानंतर श्रीरामपूर, जामखेडसाठी सरकारकडून रॉकेल उपलब्ध

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संभाव्य इंधन टंचाईचा सामना करण्यासाठी सरकारने दोन महिन्यांपूर्वी रेशनवर पुन्हा रॉकेल (घासलेट) उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २ लाख १६ हजार लीटर रॉकेलचा कोटा मंजूर करण्यात आला आहे. २ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आता श्रीरामपूर आणि जामखेड तालुक्यासाठी प्रत्येकी १२ हजार लीटर याप्रमाणे २४ हजार लीटर रॉकेलचा पुरवठा झाला आहे. मात्र, सध्या कोणाकडेही मागणी नसताना सरकारने पाठवलेले हे रॉकेल विकत कोण घेणार? असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

देशात एलपीजी गॅसचा वापर वाढल्यानंतर महाराष्ट्रात रेशनवरील रॉकेलचे वितरण टप्प्याटप्प्याने पूर्णपणे बंद करण्यात आले होते. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील नागरिकांना रेशनवर रॉकेल मिळत नव्हते. मात्र, आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि इंधन पुरवठ्यावरील संभाव्य ताण लक्षात घेऊन सरकारने एप्रिल महिन्यात पुन्हा रॉकेल पुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयापूर्वी, जिल्ह्यात रॉकेलवर चालणारे स्टोव्ह उपलब्ध आहेत का, तसेच नागरिकांकडे स्टोव्ह नसल्यास तालुकानिहाय बाजारपेठेत स्टोव्ह विक्रीसाठी उपलब्ध आहेत का, याची माहिती प्रशासनाकडून घेण्यात आली होती.

प्रत्यक्षात बाजारात अथवा नागरिकांकडे स्टोव्ह उपलब्ध नसतानाही सरकारने जिल्ह्यासाठी हा रॉकेलचा कोटा रवाना केला आहे. जिल्ह्यासाठी एकूण २ लाख १६ हजार लीटर रॉकेलचा कोटा मंजूर झाला आहे. ६२ रुपये ७५ पैसे प्रतिलीटर या दराने प्रत्येक रेशनकार्ड कुटुंबाला ३ लीटर रॉकेल वितरीत करण्यात येणार आहे. सध्या श्रीरामपूर आणि जामखेड तालुक्याला मिळालेले २४ हजार लीटर रॉकेल प्रायोगिक तत्त्वावर दिले जाईल.

## ‘एक झाड, एक श्वास’ संकल्पाने खांबेवाडीत वृक्षारोपण

**अक्षराज : विकास सरवळे**



**दि.२६, पंढरपूर :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त खांबेवाडी, ता. करमाळा येथे ’एक झाड, एक श्वास, एक संकल्प पर्यावरणाचा सन्मान’ या घोषवाक्याखाली भव्य वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मनसे तालुकाध्यक्ष संजय (बापू) घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली व मनसे ता.उपाध्यक्ष पै.अशोक गोफने यांच्या वतीने हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा न देता निसर्ग संवर्धनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम ठरला. या वृक्षारोपण कार्यक्रमासाठी खांबेवाडी ग्रामपंचायत उपसरपंच आदिनाथ शिंदे, सदस्य दादासाहेब वायकुळे, पोलीस पाटील अनिल देवकते हे आवर्जून उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते सुशील नरोटे, अमोल वायकुळे, बालाजी गरड, अजय माने, मुन्ना टकले, विकी टकले, विशाल नरोटे यांनी ही सहभाग नोंदवला. अंगणवाडी सेविका बानुबाई मोठे, स्वाती गोरे, माधुरी नरोटे यांच्यासह जि.प. प्रा.शाळा खांबेवाडीचे विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने वृक्षारोपणात सहभागी झाले होते. लहान मुलांच्या हातून झाडे लावून पर्यावरण रक्षणाचे धडे देण्यात आले. खांबेवाडी ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित हा कार्यक्रम ’अतिशय आनंद उत्सवात’ पार पडला. प्रत्येक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. राज साहेबांच्या विचारांचा वारसा जपत पर्यावरण रक्षणासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी भावना मनसे पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## बाटली, कॅनमध्ये इंधन देण्यास नकार; ग्राहकांकडून पेट्रोल पंपाविरोधात कारवाईची मागणी



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.२६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** तालुक्यातील एका एचपी पेट्रोल पंपावरील ग्राहक सेवेबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. बाटली अथवा कॅनमध्ये पेट्रोल व डिझेल देण्यास नकार, मशीनवरील रकमेचा मीटर स्पष्ट दिसणार नाही अशी व्यवस्था, तसेच मोठ्या आवाजात गाणी लावल्यामुळे ग्राहकांना इंधनाची रक्कम व प्रमाण स्पष्ट ऐकू येत नसल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांकडे बाटलीमध्ये पेट्रोल व कॅनमध्ये डिझेल मिळते का, अशी विचारणा केली असता सीसीटीव्ही कॅमेरे सुरू असल्याने बाटली किंवा कॅनमध्ये इंधन देता येत नाही, असे उत्तर देण्यात आले. मात्र, ट्रॅक्टरसाठी कॅनमध्ये डिझेल दिले जात असल्याचे फोटो दाखवल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने ट्रॅक्टरवाल्यांना देतो, असे सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे.याशिवाय, इंधन भरण्याच्या मशीनवर प्लास्टिकचे कव्हर टाकल्यामुळे मीटरवरील आकडे स्पष्ट दिसत नसल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तसेच, पेट्रोल पंपावर मोठ्या आवाजात गाणी वाजवली जात असल्याने ग्राहकांनी सांगितलेली रक्कम कर्मचाऱ्यांना नीट ऐकू येत नाही. त्यामुळे मागितलेल्या रकमेपेक्षा जास्त किंवा कमी इंधन भरले जात असल्याचा संशय ग्राहकांनी व्यक्त केला आहे.संबंधित कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचा ही आरोप करण्यात आला असून, या संपूर्ण प्रकाराची चौकशी करून संबंधित पेट्रोल पंपावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्राहकांनी प्रशासनाकडे केली आहे.